## विकसित भारत–रोजगार, आजीविका हमी अभियान विधेयक सादर



**नवी दिल्ली :** लोकसभेत मंगळवारी (दि.१६) केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी विकसित भारत–रोजगार आणि आजीविका हमी अभियान विधेयक २०२५ सादर केले. हे विधेयक २० वर्षं जुन्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मनरेगाची जागा घेईल. नवे विधयेक ग्रामीण कुटुंबांना १२५ दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची हमी देईल. त्याचबरोबर विकसित भारत २०४७च्या अनुषंगाने एक आधुनिक वैधानिक चौकट तयार करेल. हे मनरेगा विधेयकापेक्षा एक मोठे आणि सुधारित विधेयक असेल. संरचनात्मक त्रुटी दूर करून रोजगार निर्मिती, पारदर्शकता, नियोजन यांना प्रोत्साहन देण्यासाठी हे विधेयक असेल. या नवीन विधेयकाचा उद्देश मजुरांना अधिक हमी, चांगले वेतन, कामाच्या ठिकाणी संरक्षण तसेच वेतनात अधिक पारदर्शक अंमलबजावणी असल्याचे सरकारने म्हटले आहे.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १५०
www.ramprahar.com

◆ बुधवार, १७ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

शेकापचे नेते अस्लम राऊत करणार राष्ट्रवादीत प्रवेश/२
सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींना केली अटक/५
क्रिकेटपटू आर्यन नाईकची आयएसपीएलमध्ये निवड/८

### लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीची स्पष्ट भूमिका

# विमानतळाला ‘दिबां’च्या नावासाठी कृती समितीच्या सदैव पाठीशी!

## सहकार्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मानले आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांचे लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासंदर्भात मंगळवारी (दि.१६) लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीने आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करत रायगडचे माजी खासदार तथा लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान विमानतळ प्रकल्पबाधित २७ गाव संघर्ष समिती ही सुरुवातीपासूनच लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सर्वपक्षीय कृती समितीसोबत असून पुढेही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचा निर्धार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या वेळी २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, उपाध्यक्ष सी.टी. पाटील, प्रवक्ते रूपेश धुमाळ, सहसचिव चेतन डाऊर, संपर्क प्रमुख किरण पवार, पद्माकर पाटील, समीर केणी यांच्यासह अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



या भेटीबाबत २७ गाव संघर्ष समितीचे सचिव प्रेम पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आपल्या जमिनी देणाऱ्या २७ गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना विमानतळाशी संबंधित विविध प्रशिक्षण मिळावे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे परिसरात आवश्यक जागा उपलब्ध करून दिली आहे. गेल्या चार महिन्यांपासून उलवे नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना विमानतळाशी संबंधित प्रशिक्षण दिले जात आहे. या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी आज आम्ही ही भेट घेतली.

प्रेम पाटील पुढे म्हणाले की, संपूर्ण २७ गाव संघर्ष समिती ही लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या पाठीशी सुरुवातीपासून खंबीरपणे उभी आहे आणि यापुढेही सोबत राहील.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही या वेळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल, हे पुन्हा एकदा ठामपणे सांगितले.

# मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजप-शिवसेनेची संयुक्त बैठक

### महायुतीच्या विजयाचा निर्धार

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची संयुक्त बैठक मंगळवारी (दि. १६) झाली. या बैठकीनंतर मंत्री आशिष शेलार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत आमचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला असून महायुतीचे १५० प्लस नगरसेवक निवडून आणणे हा आमचा आकडा असल्याचे म्हटले.

भाजप कार्यालयात प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत दोन्ही पक्षांनी निवडणुकीच्या जागांचा आढावा घेतला. या बैठकीला भाजप मुंबई अध्यक्ष अमित




साटम, निवडणूक प्रभारी आशिष शेलार आणि शिंदेसेनेकडून मंत्री योगेश कदम, माजी खासदार राहुल शेवाळे व इतर नेते उपस्थित होते.

या वेळी विरोधकांचा समाचार घेताना मंत्री शेलार म्हणाले की, त्यांच्याकडे मुद्दे नाहीत. त्यामुळे ते असत्य, खोटे भ्रम पसरवण्याचे काम करत आहेत. मुंबई मराठी माणसांची आणि महाराष्ट्राची आहे. जोपर्यंत सूर्य, चंद्र, तारे आहेत तोपर्यंत कुणीही मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करू शकत नाही. मुंबई महापौर मराठी असेल यात शंका नाही. उद्धव ठाकरे यांनी त्यांचा महापौर कुठल्या मोहल्ल्यातून येईल हे घोषित करावे.

## धावत्या ट्रेनमध्ये महिलेची प्रसूती

**कर्जत : प्रतिनिधी**

सोलापूर–मुंबई सिद्धेश्वर एक्स्प्रेसमधील गर्भवती महिलेला प्रसुतीचा त्रास सुरू होताच त्याच रेल्वेगाडीमधून प्रवास करीत असलेल्या एका डॉक्टरने देवदूत बनून त्या महिलेची प्रसूती यातनेतून सुटका केली. महिलेला कन्यारत्न झाले असून डॉक्टरांनी आपले कर्तव्य चोखपणे निभावत माणुसकीचे दर्शन घडवले आहे.

प्रसुतीनंतर महिला व नवजात बालिकेला नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले व नंतर कुटुंबासोबत पाठवण्यात आले. **(सविस्तर पान ५ वर..)**

# दाट धुक्यामुळे ११ वाहने एकमेकांवर धडकली

### १३ जणांचा मृत्यू, २५हून अधिक जखमी

**मथुरा : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील मथुरा येथील यमुना एक्सप्रेस वेवर मंगळवारी (दि. १६) पहाटे दाट धुक्यामुळे साखळी अपघात झाला, ज्यात आठ बस आणि तीन कारसह ११ वाहने एकमेकांवर आदळली. या अपघातात १३ जणांचा मृत्यू, तर २५हून अधिक जखमी झालेत.

आग्रा–नोएडादरम्यान बलदेव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खडेहरा गावाजवळ हा अपघात घडला. मृतांमध्ये अनेक जण वाहनांना लागलेल्या आगीत भाजल्याने मृत्युमुखी पडले आहेत. जखमींवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जखमींवर तातडीने योग्य उपचार करण्याचे निर्देश दिले आहेत तसेच मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे.

## निवडक

### मेस्सीच्या कार्यक्रमात गोंधळप्रकरणी प. बंगालच्या क्रीडामंत्र्यांचा राजीनामा

**कोलकाता :** अर्जेंटिनाचा सर्वकालीन सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या ‘जीओएटी टूर’ कार्यक्रमादरम्यान साल्ट लेक स्टेडियमवर झालेल्या गोंधळाच्या चौकशीचे आदेश सरकारने दिल्यानंतर पश्चिम बंगालचे क्रीडा मंत्री अरूप विश्वास यांनी मंगळवारी (दि.१६) आपल्या पदाचा राजीनामा दिला. मेस्सीच्या कार्यक्रमात झालेल्या गोंधळानंतर अरुप यांच्यावर चौफेर टीका झाली होती.

### थायलंडला पळालेले लुथरा बंधू अखेर भारतात दाखल

**नवी दिल्ली :** गोव्यातील बर्च बाय रोमियो लेन या नाईट क्लबमध्ये ६ डिसेंबर रोजी लागलेल्या भीषण आगीत २५ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात मोठी कारवाई करत क्लबचे मुख्य मालक असलेले सौरभ लुथरा आणि गौरव लुथरा यांना थायलंडमधून भारतात डिपोर्ट करण्यात आले आहे. दोघेही आता भारतात परतले असून त्यांना न्यायालयात हजर केले जाणार आहे.

# नागरिकांना अपेक्षित विकासासाठी भाजप कटीबद्ध -आमदार प्रशांत ठाकूर





## कळंबोलीत जनसंपर्क कार्यालयांचे उद्घाटन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

जनसंपर्क कार्यालयांच्या माध्यमातून जनतेच्या समस्यांचे निराकरण झाले पाहिजे. याद्वारे नागरिकांना अपेक्षित असलेला विकास करण्यासाठी कटीबद्ध होऊयात, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोली येथे केले.

भाजपचे कळंबोलीतील युवा नेते अमर ठाकूर यांनी आणि महिला मोर्चाच्या कळंबोली शहर सरचिटणीस सरस्वती काथारा यांनी जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयांचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १५) करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, उपाध्यक्ष गणेश कडू, कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, महिला मोर्चाच्या कळंबोली शहराध्यक्ष मोनिका महानवर, माजी नगरसेवक रवींद्र भगत, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, अशोक मोटे, सित्तू शर्मा, युवा नेते हॅप्पी सिंग, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, प्रभाग १०चे अध्यक्ष रामा माहनवर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. या जनसंपर्क कार्यालयांबद्दल दोघांनाही उपस्थितांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. **(पान २ वर..)**

## बैलगाडी शर्यतीचा थरार



**अलिबाग : बैलगाडी शर्यत म्हणजे पारंपरिक खेळ असून ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. बैलांची शर्यत म्हटली की मोकळे मैदान किंवा शेत, उडणारी धूळ असे चित्र सर्वसाधारणपणे डोळ्यासमोर येते, पण अलिबागच्या किनारपट्टीवर असलेल्या भागात ही स्पर्धा मोठ्या उत्साहात समुद्रकिनारी आयोजित केली जाते. अशाच जल्लोषपूर्ण वातावरणात मंगळवारी बैलगाडी शर्यतीचा थरार किहीम समुद्र किनाऱ्यावर रंगला. तो पाहण्यासाठी शेकडो शर्यतप्रेमी उपस्थित होते.** (छाया : जितू शिगवण)

## विजय दिनानिमित्त सैनिकांना अभिवादन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सन १९७१मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात भारतीय जवानांनी आपले अतुलनीय शौर्य आणि बलिदान यांच्या बळावर देशाला विजय मिळवून दिला होता. या विजय दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शूर सैनिकांना अभिवादन केले.

भारतीय सैनिकांनी दाखवलेले शौर्य, पराक्रम आणि मातृभूमीप्रति असलेली त्यांची निष्ठा देशासाठी सदैव प्रेरणादायी राहील, असे राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटले आहे, तर भारतीय जवानांनी आपली निःस्वार्थ सेवा आणि पराक्रमाने देशाच्या इतिहासात हा क्षण कोरल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या सोशल मीडिया संदेशात नमूद केले आहे.

# कॅमेरून ग्रीन आयपीएलमधील सर्वात महागडा खेळाडू ठरला

### मिनी-ऑक्शनमध्ये केकेआरने २५.२० कोटींना केले खरेदी

**अबुधाबी : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६चा मिनी–लिलाव मंगळवारी (दि.१६) अबुधाबी येथे झाला. यामध्ये ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीनला कोलकाता नाईट रायडर्स संघाने तब्बल २५ कोटी २० लाख रुपयांना आपल्या ताफ्या दाखल करून घेतले. यासह ग्रीन आता आयपीएल लिलावाच्या इतिहासातील सर्वात महागडा परदेशी खेळाडू बनला आहे.

कॅमरून ग्रीन यापूर्वी मुंबई इंडियन्स आणि रॉयल्स चॅलेंजस बंगळुरू संघांकडून खेळला आहे. २०२३मध्ये जेव्हा तो मुंबई इंडियन्समध्ये सहभागी झाला तेव्हा त्याला १७.५० कोटी रुपये मिळाले. त्यानंतर तो



त्याच किमतीत आरसीबीमध्ये दाखल झाला. तो एक वर्ष आयपीएलला मुकला, पण आता त्याने जोरदार पुनरागमन केले आहे. आयपीएल खेळण्याचे हे त्याचे तिसरे वर्ष आणि हा त्याचा तिसरा संघ आहे.

श्रीलंकेचा गोलंदाज मथीशा पथिराना याला कोलकाता नाईट रायडर्सने १८ लाखांना खरेदी केले.

मिनी लिलावात कॅप्ड खेळाडूंपेक्षा अनकॅप्ड खेळाडूंवर मोठी बोली लागताना पहायला मिळाली. चेन्नई सुपर किंग्सने आगामी सीझनसाठी रवींद्र जडेजाचा बदली खेळाडू म्हणून अष्टपैलू प्रशांत वीरला १४ कोटी लाख रुपयांना खरेदी केले. मूळचा उत्तर प्रदेशच्या अमेठी येथील वीर हा डावखुरा फिरकी गोलंदाज असून एक चांगला फलंदाजदेखील आहे. विकेट किपर बॅटरच्या गटात असलेल्या राजस्थानच्या कार्तिक शर्मासाठीही चेन्नई सुपर किंग्जच्या संघाने १४ कोटी २० लाख रुपये मोजले.

इंग्लंडचा अष्टपैलू लियाम लिव्हिंगस्टोन याला सनरायझर्स हैदराबादने १३ कोटी रुपये देत आपल्या संघात सहभागी केले आहे.

# महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय स्मारक आणि संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव

## ◆ खासदार सुनील तटकरे यांनी घेतली गृहमंत्री अमित शाह यांची भेट

**पाली : प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथे देशाचे केंद्रीय गृहमंत्री श्री. अमितजी शाह यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दि. (१६) मंगळवारी भेट घेतली. यावेळी महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळे येथे २० मार्च १९२७ रोजी केलेल्या ऐतिहासिक सत्याग्रह आंदोलनाला २०२७ साली शंभर वर्ष पूर्ण होत आहे. 'चवदार तळे सत्याग्रह' शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक व संग्रहालय उभारण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. गृहमंत्री श्री. अमितजी शाह यांच्याकडे सादर केला.



महाडचा सत्याग्रह हा देशाच्या नैतिक, सामाजिक व घटनात्मक इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ रोजी केलेला 'चवदार तळे सत्याग्रह' हा समता, सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या लढ्याचे एक ऐतिहासिक प्रतीक आहे. शताब्दी वर्षानिमित्त महाडच्या या ऐतिहासिक वारसा स्थळाला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देण्याबाबत मा. गृहमंत्री श्री. अमितजी शाह यांच्याशी तटकरे यांची सकारात्मक व सखोल चर्चा झाली.

या चर्चेदरम्यान २०२७ सालच्या 'चवदार तळे सत्याग्रह' शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने उभारण्यात येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक व संग्रहालय हे प्रादेशिक तसेच राष्ट्रीय पातळीवर अभिमानास्पद बाब ठरेल. त्यामुळे अभ्यासक, विद्यार्थी व पर्यटकांसाठी 'चवदार तळे' हे ऐतिहासिक प्रेरणास्थान बनेल. तसेच एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त केला. महाड व रायगड या दोन्ही ऐतिहासिक वारशांचे एकत्रीकरण केल्यास स्थानिक पर्यटन व उपजीविकेला मोठी चालना मिळेल. त्यादृष्टीने या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती गृहमंत्र्यांकडे केली.

# शेकापचे जेष्ठ नेते अस्लम राऊत करणार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

## २० डिसेंबरला मोर्बा येथे होणार भव्य कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा गावचे शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते व रायगड जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती अस्लम राऊत यांनी शेतकरी कामगार पक्षाला सोडचिठ्ठी घेण्याचा निर्णय घेतला असून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत.

अस्लम राऊत यांनी शेतकरी कामगार पक्षाचे गेली अनेकवर्ष प्रामाणिकपणे काम केले असून पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. रायगड जिल्हा परिषदेवर तीनवेळा ते निवडून आले शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ रोजी त्यांच्या पक्ष प्रवेश



कार्यक्रमाचा मुहूर्त ठरला असून मोर्बा येथील एस.एस. हायस्कुलच्या मैदानावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा रायगड – रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे,राज्याच्या महिला व बालविकासमंत्री ना.आदिती तटकरे,माजी आ.अनिकेत तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या भव्यदिव्य कार्यक्रमात ते आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत.

पक्ष प्रवेश कार्यक्रमाची जोरदार तयारी मोर्बा विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सुरु करण्यात आली असून त्यांचा राष्ट्रवादी पक्ष प्रवेशामुळे मोर्बा शहरात आता कोणी विरोधक शिल्लक उरला नाही आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेशाबाबत बोलताना त्यांनी सांगितले कि,मला मोर्बा जिल्हा परिषद गटाची उमेदवारी व प्रलंबित विकासकामे मार्गी लावावीत या अटीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

# महापालिका कार्यक्षेत्रात परवानाधारकांना अग्निशस्त्र सोबत बाळगण्यास मनाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका निवडणूक सन २०२५ या निवडणूकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला असून दि.१५ डिसेंबर २०२५ रोजी पासून आचारसंहिता लागू झाली आहे. मतदान शांत, निर्भय व निःपक्षपाती वातावरणात पार पाडावे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीमधील नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये दि.१५ डिसेंबर २०२५ रोजी पासून दि.१८ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक प्रकीया पूर्ण होईपर्यंत पोलीस आयुक्त, नवी मुंबई मिलिंद भारंबे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये खालील कृत्यास मनाई आदेश जारी केला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये शस्त्र परवानाधारक यांना शस्त्र, अग्निशस्त्र सोबत बाळगण्यास मनाई करण्यात येत आहे. हा मनाई आदेश शासकीय कर्तव्यावरील पोलीस अधिकारी/अंमलदार व संरक्षण/सुरक्षेकामी नेमलेल्या तत्सम इसमास त्याचप्रमाणे दिर्घकालीन स्थायी कायदा, रूढी व परंपरा यांनुसार शस्त्रास्त्रे बाळगण्यास हक्कदार आहे त्या समाजाचे व्यक्तींना लागू असणार नाही. तसेच छाननी समितीने ज्यांना सवलत दिलेली आहे त्या शस्त्र परवानाधारकांना हा मनाई आदेश लागू असणार नाही.

ज्या परवानाधारकांना या आदेशान्वये छाननी समितीने सवलत दिलेली आहे त्या परवानाधारकांनी आपली शस्त्रे निवडणुकीच्या कोणत्याही कार्यक्रमा दरम्यान उदा. प्रचार, रोड शो, सभा व रॅली प्रसंगी जवळ बाळगू नये. प्रत्येक शस्त्र परवानाधारकास आदेशापूर्वी नोटीस बजावणे शक्य नसल्याने कलम १६३ (२) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

# ठाकरे बंधूंच्या युतीची घोषणा आठवडाभरात -संजय राऊत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह महाराष्ट्रातल्या एकूण २९ महानगरपालिकांमधील निवडणुकांची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली. या पार्श्वभूमीवर आता या महापालिका क्षेत्रांमध्ये राजकीय वातावरण तापू लागले आहे. मुंबईत गेल्या काही महिन्यांपासून चर्चा असलेली ठाकरे बंधूंची युती आता प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

येत्या आठवडाभरात या युतीची घोषणा होईल, असे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार व मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांनी म्हटले आहे, मात्र त्याचवेळी काँग्रेसला त्यांनी थेट इशारा दिला आहे.

संजय राऊतांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या युतीबाबत भाष्य केले. उद्धव ठाकरे व राज ठाकरे एकत्र आल्यामुळे लोकांमध्ये आत्मविश्वास व उत्साह निर्माण झाला आहे. आम्ही मुंबईसह २९ महापालिका निवडणुकांमध्ये उतरण्यासाठी सज्ज आहोत. मुंबई, ठाणे, कल्याण–डोंबिवली, मीरा भाईंदर, पुणे व नाशिक या प्रमुख महापालिकांमध्ये आम्ही एकत्र लढतो आहोत. इतर महापालिकांमध्ये स्थानिक पातळीवरचे नेते निर्णय घेतील.

भले तुम्ही आमच्यावर पाठीमागून वार करा, पण आम्ही लढण्यासाठी सज्ज आहोत. राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र निवडणुका लढवणार आहेत, असे राऊत यांनी काँग्रेसला उद्देशून म्हटले.

# जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान यशस्वी; २३ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी तसेच सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.प्राची नेहूलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ नोव्हेंबर ते दि.०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आलेले कुष्ठरोग शोध अभियान यशस्वीपणे पूर्ण झाले आहे.

२०१७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात व्यापक सर्वेक्षण करण्यात आले. या कालावधीत ५ लाख २२ हजार ८३४ घरांना प्रत्यक्ष भेटी देऊन २३ लाख २० हजार ८९३ नागरिकांची शारीरिक तपासणी करण्यात आली. यामधून २२ हजार ६३४ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली असून, वैद्यकीय अधिकारी व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी सखोल तपासणीनंतर १५१ रुग्ण कुष्ठरोग बाधित असल्याचे निष्पन्न केले.

नवीन आढळून आलेल्या रुग्णांमध्ये ६१ सांसर्गिक तर ९० असांसर्गिक रुग्णांचा समावेश आहे. संबंधित सर्व रुग्णांना तात्काळ शासकीय आरोग्य संस्थांमार्फत मोफत औषधोपचार सुरू करण्यात आले असून नियमित फॉलो–अप, समुपदेशन व आवश्यक ते मार्गदर्शन देण्यात येत आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेत निदान व उपचार केल्यास अपंगत्व टाळता येते, जिल्हा आरोग्य यंत्रणा, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्यामुळे हे अभियान यशस्वी ठरल्याचे प्रशासनाने नमूद केले.

दरम्यान, त्वचेवर पांढरे किंवा लाल डाग, न खाजणारे चट्टे, बधिरता, जखमा न भरणे अशी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

# 'महापारेषण'ला तीन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

**डेहराडून : वृत्तसंस्था**

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण उत्तराखंड विधानसभेच्या अध्यक्ष रितू खंडुरी भूषण व माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री डॉ. रमेश पोखरियाल निशंक यांच्या हस्ते झाले.

यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर, सर्वोत्कृष्ट फिल्म (इंग्रजी) व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

उत्तराखंडमधील डेहराडूनच्या हॉटेल एमरॉल्डमध्ये आयोजिलेल्या ४७ व्या भारतीय जनसंपर्क परिषदेच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, गेल इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदीप गुप्ता, पद्मश्री डॉ. बी. व्ही. के. संजय यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनधिकृत बॅनर्स–पोस्टर्सवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०२५ चा कार्यक्रम १५ जानेवारी रोजी जाहिर करण्यात आला आहे. या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या राजकीय बॅनर्स, पोस्टर्स व फलकांवर महापालिकेकडून व्यापक कारवाई करण्यात येत आहे.

महापालिकेच्या संबंधित विभागांमार्फत शहरातील विविध प्रभागांमध्ये तपासणी करून



अनधिकृतरीत्या लावलेले राजकीय बॅनर्स व पोस्टर्स हटविण्यात आले. यामध्ये अ, ब, क आणि ड या चारही प्रभागांमध्ये एकूण २७८३ अनधिकृत बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले आहेत. यामध्ये अ प्रभागात ६११, ब प्रभागात ५१०, क प्रभागात ७६० तर ड प्रभागात ३२२ व नावडे उपविभागात ५८० बॅनर्स व पोस्टर्सचा समावेश आहे. तसेच, बसथांबे व सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेल्या जाहिरातींपैकी ८६ ठिकाणी जाहिराती झाकण्यात (कव्हर करण्यात) आल्या असून, काढलेल्या व झाकलेल्या सामुग्रीची प्रभागनिहाय यादी ६२० आहे.

महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असून, राजकीय पक्ष, उमेदवार व समर्थकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चालकाचे नियंत्रण सुटून कार गेली खड्ड्यात; चौघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**



मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील हाळ गाव खालापूर पोलीस स्टेशनची हद्दीत गाडी अल्टो कार चालक दत्तात्रय पाटील यांना खोकला आल्याने त्यांचे स्टेरिंग वरील कंट्रोल सुटले आणि गाडी रस्त्याच्या खाली खड्ड्यात घसरली. या घटनेत चालकासह ४ जण किरकोळ जखमी झाले. जखमींना खोपोली येथील जाखोटिया रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुशीला कृष्णा ठोंबरे , रिया फाटे दत्ता चिंदु पाटील कोस्तुभ पाटील रा . खालापूर: वनवठे येथील रहिवासी आहेत.

## दुखवटा

### द्वारकानाथ हनुमंते



**चौक :** शहर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांचे वडील आणि चौक परिसरातील पहिल्या पिठाच्या चक्कीचे प्रणेते द्वारकानाथ रामचंद्र हनुमंते यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते.त्यांच्या मागे मुलगा चौक व्यापारी असोसिएशन अध्यक्ष हर्षल हनुमंते,धर्मपत्नी, दोन विवाहित मुली, सुन,नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक,राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### बारकी शिंदे



**माणगाव :** श्रीमती बारकी बापू शिंदे यांचे रविवार, दि. १४ डिसेंबर रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात चार कन्या व दोन पुत्र, नातवंडे व जावई असा मोठा परिवार आहे. त्या माणगाव येथील व्यावसायीक विठ्ठल बापू शिंदे यांच्या मातोश्री होत.त्यांचा बारावा विधी बुधवार, दि. २५ डिसेंबर रोजी होणार आहे.

### राजाराम म्हात्रे



**उरण :** चिरनेर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक आणि नाट्य अभिनय, संगीत, काव्य व लेखन या सर्व आघाड्यांवर आपली नाममुद्रा उमटविणारे कलासक्त कलायात्री राजाराम शिवराम म्हात्रे (गुरुजी) (८९) यांचे वृद्धपकाळाने, चिरनेर येथील राहत्या घरात दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन पुत्र, सुना, नातजावई नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे.



**कामोठे : येथील सेक्टर १९मध्ये क्रिस्टल रियल्टी रिअल इस्टेटचे उद्घाटन सोमवारी करण्यात आले. क्रिस्टल रियल्टी रिअल इस्टेटचे प्रो. प्रा. कन्वेश म्हात्रे असून प्रॉपर्टी घेणाऱ्या नागरिकांना ते मार्गदर्शन करणार आहेत.**

# जलतरण स्पर्धेत रुद्राणी पाटीलचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे सोमवारी पार पडलेल्या सिंधुदुर्ग ओपन वॉटर स्विमिंथॉन या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत पनवेल तालुक्याची कन्या रुद्राणी पाटील हिने चांगली कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या स्पर्धेत ५०० मीटर सी स्विमिंग प्रकारात रुद्राणी हिने ११ मिनिटे २५ सेकंद या वेळेत अंतर पूर्ण केले. सात वर्षांखालील वयोगटातील ३४ स्पर्धक मुलींमध्ये तिने चौथा क्रमांक पटकावत आपल्या गुणवत्तेची प्रचिती दिली. कमी वयात खुले समुद्रातील आव्हानात्मक स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण करत तिने धैर्य, चिकाटी आणि शिस्तबद्ध सरावाचे दर्शन घडवले.

रुद्राणीच्या या यशामागे तिचे प्रशिक्षक समर्थ नाईक यांचे विशेष मार्गदर्शन, सातत्यपूर्ण प्रशिक्षण व प्रोत्साहन मोलाचे ठरले. कठीण समुद्री परिस्थितीत योग्य तंत्र, श्वसन नियंत्रण आणि सहनशक्ती वाढविण्यावर दिलेल्या भरामुळे रुद्राणीला ही कामगिरी साध्य करता आली, असे क्रीडावर्तुळातून सांगितले जात आहे.

या उल्लेखनीय यशामुळे पनवेल तालुका तसेच रायगड जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्वल झाले असून, रुद्राणीवर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी कुटुंबीय, प्रशिक्षक, क्रीडाप्रेमी व स्थानिक नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.




## पान १ वरुन

# नागरिकांना अपेक्षित विकासासाठी भाजप कटीबद्ध –आमदार प्रशांत ठाकूर

सर्वसामान्यांची तळमळीने कामे करणारा, नागरिकांच्या समस्या दूर करणारा आणि समाजकार्य करण्यासाठी सदैव तत्पर असणारा कार्यकर्ता म्हणून अमर ठाकूर यांची ओळख आहे, असे गौरवोद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी काढले; तर एखाद्या वाघिणीप्रमाणे सरस्वती काथारा या जनतेच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचे काम करतात, अशा शब्दांत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

सरस्वती काथारा यांनी कळंबोलीत दोन ठिकाणी जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. त्यांनी ही कार्यालये जनतेच्या समस्या मांडण्याचे हक्काचे ठिकाण असेल. आम्ही नागरिकांच्या समस्या सोडवू, अशी ग्वाही दिली.

# पनवेल महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## अधिकाऱ्यांची बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चा कार्यक्रम १५ जानेवारी रोजी जाहिर करण्यात आला आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांची मंगळवारी (दि.१६) मुख्यालयात निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

पनवेल महापालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने २० प्रभागातील ७८ जागांसाठी निवडणूक होणार असून १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी ६ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त अधिकाऱ्यांमध्ये उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, अप्पर तहसीलदार तसेच महानगरपालिका व इतर शासकीय विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्रत्येक निवडणूक विभागासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह दोन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

**प्रभागनिहाय अधिकारी नियुक्त**

प्रभाग क्रमांक १,२,३ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून भारत वाघमारे (जिल्हाधिकारी-पुर्नवासन, रायगड) यांची नियुक्ती केली आहे. तसेच अर्चना प्रधान आणि नितीन राठोड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग ४,५,६ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्ञानेश्वर खुटवड (उपविभागीय अधिकारी) यांची नियुक्ती केली आहे. तसेच संतोष मांढरेआणि नितीन राठोड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग ७,८,९,१० निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमित शेडगे ( मुद्रांक जिल्हाधिकारी) यांची नियुक्ती केली आहे. नरेश पेढवी, विशाल हुडेकर,यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक ११,१२,१३ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अविशकुमार सोनोने( उपजिल्हाधिकारी मेट्रो) यांची नियुक्ती केली आहे. रवींद्र सानप आणि सिध्दार्थ कांबळे यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग १४.१५.१६ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ललिता बाबर( उपायुक्त नवी मुंबई मनपा) ) यांची नियुक्ती केली आहे. जितेंद्र इंगळे आणि सौरभ परभरणकर यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग १७.१८ १९ ,२० चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पवन चांडक (उपविभागीय अधिकारी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारत फुलपगारे आणि कविता मोकल यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## आरोग्यमय जीवनासाठी शारीरिक तंदुरूस्ती महत्त्वाची -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आरोग्यमय राहण्यासाठी केवळ आरोग्याची तपासणी न करता शारीरिक तंदुरुस्तीकडे लक्ष द्या, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या वतीने आयोजीत केलेल्या भव्या महाआरोग्य शिबिरावेळी केले.

स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या वतीने महिला आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन मंगळवारी केले होते. जनहिताच्या दृष्टिकोनातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या सर्वेसर्वा विजया कदम यांच्या विशेष प्रयत्नातून हा उपक्रम पार पडला. आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष ही मोठी समस्या बनली आहे. विशेषतः महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिरासाठी वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांची उपस्थिती लाभली.

यामध्ये डॉ. शेखर पाध्येगुर्जर, डॉ. मानसी पाध्येगुर्जर, डॉ. किशोर चव्हाण आणि डॉ. संजीव कांबळे यांचा समावेश होता. स्त्रीशक्ती फाउंडेशनच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. आरोग्य सुदृढ असेल, तरच कुटुंब सुदृढ राहते आणि समाज सक्षम होतो, याच विचारातून हा उपक्रम राबवण्यात आला. नागरिकांसाठी सामान्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले.

या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष अमर पाटील, महिला मोर्च्याच्या जिल्हा अध्यक्षा प्रिया मुकादम, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, युवा नेते अमर ठाकूर, गौरव नाईक, प्रवीण बेरा, निशांत गील, विवेक बोर्डे, प्रकाश शेलार, अदिती मुद्राले, शुभांगी निर्मले, शीतल दिनकर, अर्चना देवकर, दुर्गा सहानी, विद्या फरांदे, मयुरी पेरवी, मनीषा गोठवाल, रुपाली मोकल, मनीषा करे आदी उपस्थित होते.

## पुनाडेत आज रस्त्याचे भूमिपूजन

**उरण :** पुनाडे ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्याचे भूमीपूजन सोहळा बुधवारी (दि. १७) सकाळी ९ वाजता होणार आहे.

आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीतून १० लाख रुपये मंजूर झाले आहेत. हा रस्ता गावदेवी मंदिर ते तलाव पर्यंत होणार आहे, अशी माहिती पुनाडे ग्रामपंचायत सदस्य रशिक पाटील यांनी दिली. भाजप नेते तथा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

या वेळी उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, पुनाडे सरपंच निलेश कातकरी, सदस्या अंकिता ठाकूर, रसिक पाटील, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जि..प. सदस्य जीवन गावंड, उरण तालुका उपाध्यक्ष मुकेश म्हात्रे, उद्योगपती देवेंद्र पाटील, सारडे सरपंच रोशन पाटील, भाजप नेते निलेश म्हात्रे आदी उपस्थित राहणार आहेत.



**पनवेल : येथील महापालिकेचे माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**



**खारघर : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात क्षितिज वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या वेळी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या आयुष्यातील वाटचालीवर एक छोटी डॉक्युमेंटरीही सादर करण्यात आली. कार्यक्रमास मान्यवर उपस्थित होते.**

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे विविध सामाजिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ वर्ष पूर्तीनिमित्त अर्थात अमृत महोत्सवानिमित्त संपूर्ण वर्षभर समाजहिताचे विविध उपक्रम राबवण्याचा मोठा संकल्प करण्यात आला आहे. या संकल्पाला अनुसरून रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूल येथील विद्यार्थ्यांनी समाजसेवेची सुंदर परंपरा जोपासत माऊली वेलफेअर वृद्धाश्रम नेरूळ व आदिवासी आश्रम शाळा चिरनेर येथे भेट देऊन एक आदर्श सामाजिक उपक्रम पार पाडला.





विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी व गरीब व गरजू विद्यार्थ्यांना धान्य, किराणा साहित्य, भाजीपाला, घरगुती आवश्यक वस्तू, स्वच्छता साहित्य, मेडिकल फर्स्ट-एड किट, औषधे, तसेच वस्त्र, उबदार शाल, मोजे, टॉवेल यांसारख्या वस्तूंचे मनापासून संकलन करून वितरण केले. बहुतेक साहित्य हे विद्यार्थ्यांनी स्वतः घरातून, बचतीतून किंवा स्वतःहून गोळा करून दिल्यामुळे या उपक्रमाला एक विशेष भावनिक स्पर्श मिळाला. वृद्धाश्रमात पोहोचताच विद्यार्थ्यांचे ज्येष्ठ नागरिकांनी प्रेमाने स्वागत केले. मुलांनी ज्येष्ठांशी संवाद साधला, त्यांचे अनुभव ऐकले आणि त्यांच्यासोबत काही काळ घालवल्याने वृद्धाश्रमात आनंद, उत्साह आणि आत्मीयतेचे वातावरण निर्माण झाले. अनेक ज्येष्ठ रहिवाशांनी भावूक होत विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना भरभरून आशीर्वाद दिला.

या उपक्रमाबद्दल बोलताना मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी संपूर्ण आयुष्य समाजकार्याला वाहिले आहे. त्यांच्या ७५ व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून समाजासाठी काहीतरी करण्याची शिकवण घ्यावी, हा आमचा उद्देश आहे. आजच्या उपक्रमामुळे मुलांमध्ये करुणा, संवेदनशीलता आणि सेवा यांची खरी भावना निर्माण होण्यास मदत झाली.

## तीन फुटबॉलपटूंची निवड; प्रशासनाकडून गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्युट फॉर ट्रान्सफॉर्मेशन आणि सिडको वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या स्कॉलरशिप प्रोजेक्ट ऑफ महादेवा मोहिमेतून रायगड जिल्ह्यातील तीन उदयोन्मुख फुटबॉलपटूंनी असामान्य यश संपादन केले आहे. जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय निवड चाचणीचे टप्पे पार करत श्रेया बिरादार, श्रावणी सावंत आणि आलोकी पालवे या तीन मुलींची निवड झाली आहे.

या तीन खेळाडूंना जगविख्यात फुटबॉलपटू लियॉन मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची अभूतपूर्व संधी प्राप्त झाली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तालुका क्रीडा संकुल समिती अध्यक्ष पवन चांडक यांच्या हस्ते तिन्ही खेळाडूंचा गौरव करण्यात आला. या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, पनवेल महानगरपालिका क्रीडा अधिकारी समीर रेवाळे यांच्यासह पालक आणि प्रशिक्षक उपस्थित होते.



## गोखले लॉ कॉलेजमध्ये मानवी हक्क व वकील दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क व राष्ट्रीय वकील दिनाचे औचित्य साधून गोखले एज्युकेशन सोसायटी खारघर येथील विधी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनासाठी मानवी हक्क जनजागृती कार्यक्रम शनिवार, १३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मुंबई हायकोर्टातील वकील आदित्य कटकदोंड लाभले होते. तसेच गोखले विधी कॉलेजच्या प्राचार्य श्रुती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे आदित्य कटकदोंड यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्क जनजागृती व वकीलांचे सामाजिक योगदान आणि हक्कांचे संरक्षण यावर विद्यार्थ्यांनी मानवी हक्काविषयी मार्गदर्शन केले.

गोखले एज्युकेशन सोसायटीचे विधी कॉलेजच्या प्राचार्य श्रुती जाधव यांनी विद्यार्थ्यांना मानवाधिकार दिन आपल्याला प्रत्येक व्यक्तीला सन्मान, न्याय आणि समानतेने वागवण्याची आठवण करून देत असल्याचे त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या वेळी गोखले एज्युकेशन सोसायटीचे एफ.वाय एल.एल.बीच्या विधी विद्यार्थ्यांनी समानता, शिक्षणाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सन्मानाने जगण्याचा हक्क हे मानवाधिकारांचे महत्त्वाचे भाग असून मानवाधिकारांमुळे भेदभाव, अन्याय आणि हिंसाचारापासून लोकांचे संरक्षण होत असल्याचे नाटिका सादर केल्या होत्या. प्रस्ताविक पुजा चव्हाण यांनी तर सुत्रसंचलन मानसी घरत या विद्यार्थीनी केले होते.

## गव्हाण विद्यालयात बाल आनंदमेळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचा बाल आनंदमेळा आणि व्यवसाय वृद्धीचा रम्य सोहळा सोमवारी (दि.१५) रंगला.



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा संस्थेचे लाईफ जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते या बाल आनंदमेळ्याचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, माजी सदस्या अॅडव्होकेट योगिता भगत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, किशोर पाटील, सुधीर ठाकूर, सुहास भगत, नामदेव ठाकूर, चंद्रकांत म्हात्रे, विद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्सना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, गुरूकुल प्रमुख संदिप भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, राजेंद्र चौधरी उपस्थित होते.

या वेळी विद्यालयाच्या वतीने रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल विद्यालयाच्या प्रश्नमंजुषा गटातील सारा घरत, स्मित मोकल आणि प्रतीक नाडे यांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे अटल टिंकरिंगचा विद्यार्थी वेद घरत याच्या उपकरणाची राज्यस्तरावर निवड झाल्याबद्दल त्याचा आणि पनवेल तालुका विज्ञान प्रदर्शनामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मितीत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे येथे ५३ वे तालुकास्तरीय आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सीकेटी मराठी माध्यमिक विद्यालयाच्यी गार्गी महेश म्हात्रे इयत्ता आठवी या विद्यार्थिनीने वकृत्व स्पर्धेत ’विकसित भारतासाठी विज्ञान व तंत्रज्ञान‘ या विषयावर उत्तम भाषण केले व प्रथम क्रमांक प्राप्त केला.

विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षक यांनी मार्गदर्शन केले या विद्यार्थिनीस संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्यकारणी सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, सचिव एस.टी. गडदे, शाळेचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या.




## संपादकीय

# रणसंग्रामाला सुरुवात

नगरपरिषदांपाठोपाठ राज्यातील २९ महापालिकांची बहुप्रतिक्षित निवडणूक जाहीर झाली असून १५ जानेवारीला मतदान पार पडणार आहे. या महापालिकांमध्ये गेली काही वर्षे प्रशासकीय राजवट होती. त्यामुळे निवडणुकांचे बिगुल वाजताच राजकीय आघाडीवर हालचालींना वेग आला असून लवकरच प्रचाराचा धुरळा उडताना दिसेल.

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. त्यामध्ये सुरुवातीला नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यात आल्या. आता प्रलंबित २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून महापालिकांच्या निवडणुका गेल्या पाच ते सात वर्षांपासून किंवा काही ठिकाणी त्याहीपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित होत्या. सोमवारी मुंबई, ठाणे, नवी मुंबई व पनवेलसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. यात १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून निकाल १६ जानेवारीला लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्यापासून राज्यात भारतीय जनता पक्षामध्ये येण्याची ओढ दिसते आहे. पक्षप्रवेशाबाबत प्रदेशाध्यक्ष आणि स्थानिक अध्यक्ष निर्णय घेतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. राज्यात अनेक ठिकाणी भाजपचे कार्यकर्ते स्वबळावर निवडणूक लढवण्याची मागणी करीत आहेत. त्याचवेळी महायुतीतून निवडणूक लढवण्यासाठी घटक पक्षही सकारात्मक आहेत. त्यामुळे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थानिक पातळीवर चर्चा करून निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. पनवेल महापालिकेत मागील निवडणुकीत भाजपने स्वबळावर सत्ता स्थापन केली होती. पनवेलमध्ये भाजपची ताकद निश्चितच जास्त आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीच्या घटक पक्षांशी सकारात्मक चर्चेतून जागावाटपाबाबत तोडगा काढला जाईल असे दिसते. येथे भाजप विकासाच्या मुद्यावरच लढणार आहे. विविध प्रभागांमधून झालेल्या विकासाचा फायदा भाजपला निश्चितच होईल. यंदा राज्यातील २९ महापालिकांमध्ये सगळ्यांचेच लक्ष मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे आहे. भाजपने तर यंदा मुंबईत सत्ता मिळवण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई ठरणार आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक तब्बल नऊ वर्षांनी होते आहे. गेली तीन दशके मुंबई महापालिकेत सत्तेवर असलेल्या शिवसेनेची दोन शकले झाल्यानंतर होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. या तीसपैकी सुमारे २५ वर्षे शिवसेना व भाजपची युती होती. गेल्या तीन वर्षांत राज्यात मोठ्या राजकीय उलथापालथी झाल्या असून या काळात ठाकरे गटाच्या अनेक माजी नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत तसेच भाजपमध्येही प्रवेश केला आहे. मुंबईत जो विकास गेल्या काही वर्षांत भाजपच्या काळात झाला तो मुंबईकरांच्या नजरेसमोर आहे. त्यामुळे यंदाच्या महापालिका निवडणुकीत विकासाच्या जोरावर भाजपचीच सत्ता येईल असा विश्वास भाजपचे कार्यकर्ते व नेत्यांना वाटतो आहे. राज्यात महायुतीत विविध समीकरणे दिसतील. मुंबईमध्ये मात्र महायुती चालणार असून मुंबईतील जनता भाजप आणि शिवसेनेला भरघोस मतदान करणार आहे. त्यामुळे मुंबईत कोणीही एकत्र आले तरी आम्हाला काळजी करण्याचे कारण नाही असे फडणवीस यांनी म्हटले आहे. गेला काही काळ राज्यातील महापालिकांचा कारभार प्रशासकांच्या हातात होता. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नगरसेवक हा प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा असतो. कुठल्याही अडचणीच्या वेळी नगरसेवक लोकांच्या मदतीसाठी उभे ठाकतात. त्यामुळे नगरसेवकांअभावी नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. अखेर आता महापालिका निवडणुका होत असल्यामुळे नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.**

# डॉ. श्रीराम लागू : विज्ञानवादी, समाजवादी अभिनेता


समाजात सुरू असलेल्या दांभिकतेवर सडेतोड प्रहार करण्याची हिंमत फार कमी जणांमध्ये असते. मात्र डॉ. श्रीराम लागू यांनी 'देवाला रिटायर करा' अशी जाहीर भूमिका घेत तर्कसंगत सामाजिक कारणांसाठी सतत आवाज उठवला. आपल्या पुरोगामी विचारांआड येणाऱ्या कुणाची त्यांनी तमा बाळगली नाही.

अभिनय क्षेत्रात वयाच्या ४२व्या वर्षी डॉक्टरांचा प्रवेश झाला होता. ते पाहता त्यांच्या वाट्याला काही निवडक भूमिकाच आल्या. असे असूनही डॉक्टर लागूंनी मात्र त्यांच्या वाट्याला आलेल्या प्रत्येक भूमिकेचे, त्यांच्या अभिनयाने सोने केले.

डॉक्टर श्रीराम लागू यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२७ साली महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामध्ये झाला . एक इ एन टी सर्जन म्हणून त्यांच्या वैद्यकीय कारकीर्दीची सुरुवात झाली होती. परंतू एक अभिनेता म्हणून मराठी रंगभूमीवरील आणि हिंदी-मराठी सिनेमाजगतातील त्यांच्या कर्तुत्वाचा पसारा प्रचंड आहे.

डॉक्टर श्रीराम लागू पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये शिकत होते. या शाळेमध्ये नाटकावर विशेष लक्ष दिले जाई. डॉक्टरांबद्दल असे म्हटले जाते की, लहानपणीच ते अनेकांची नक्कल करायचे. हे पाहून त्यांच्या अवतीभवतीची बरीचशी मंडळी त्याच्या आई-बाबांना, हा एक दिवस खूप चांगला अभिनेता होईल ! असे म्हणत असत. डॉक्टरांबद्दल एक असाही किस्सा सांगितला जातो की, श्रीराम लागूंना एकदा त्यांच्या शिक्षकांनी तुला नाटकात काम करायचे आहे असे सांगितले. लागूनींही जोरदार तयारी केली, मात्र प्रत्यक्ष जेव्हा रंगमंचावर उतरले तेव्हा ते प्रचंड घाबरले होते. पण त्याही परिस्थितीत त्यांनी सादरीकरण केले. त्यांच्या अभिनयाची प्रशंसाच झाली. लागूंबाबत असेही म्हटले जाते की, त्यांना स्वतःचेच नव्हे तर आपल्या सोबतच्या सहकलाकारांचेही संवाद तोंडपाठ असायचे !

डॉक्टर लागू मुळातच त्यांच्या अभ्यासात खूप हुशार होते. असे असूनही त्यांचे अभिनयाचे वेड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. मेडिकल कॉलेजला गेल्यानंतरही त्यांनी अभिनयाची साथ सोडली नाही. महाविद्यालयीन कालखंडातही डॉक्टरांनी दहा एकांकीका आणि पाच नाटकांमध्ये काम केले होते. डॉक्टरांची इच्छा तर अभिनय क्षेत्राकडे वाळण्याची होती. परंतु त्यांच्या आई-वडिलांना त्यांनी डॉक्टर व्हावे असे वाटत होते. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर डॉक्टरांनी काही काळ मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये डॉक्टरकिची प्रॅक्टिस केली.

डॉक्टरांवर लहानपणापासूनच मराठी नाटकांचा प्रभाव होता. त्यावेळचे नामवंत अभिनेते नानासाहेब फाटक, केशवराव दाते, मामा पेंडसे आणि मास्टर दीनानाथ आदींच्या अभिनयाचा डॉक्टर लागूंवर प्रचंड प्रभाव होता. त्याच दरम्यान काही अभिनेत्यांकडूनही ते प्रेरित झाले होते. त्यामध्ये पॉल म्युनी, स्पेन्सर ट्रेसी , लॉरेन्स ऑलिव्हिएर, ग्रेटा गार्बो अशी अनेक कलावंतांची नावे घेता येतील. नाटक आणि अनेक रंगकर्मी सतत डॉक्टरांच्या डोक्यात फिरत होते. दुर्दैवाने त्याच दरम्यान तीन वर्षांसाठी वैद्यकीय व्यवसायानिमित्त डॉक्टर लागूंना आफ्रिकेला जावे लागले. नियतीच्या या फेऱ्यांमध्ये डॉक्टरांना असं वाटलं की, त्यांचे सर्व जीवनच स्तब्ध झाले आहे ! परंतु लवकरच ती वेळ आली जेव्हा आफ्रिकेतून परतता क्षणीच डॉक्टर लागूंनी त्यांच्या वैद्यकीयक्षेत्राला पूर्णविराम दिला आणि नेहमीसाठी अभिनयाची कास धरली.

डॉक्टर लागूंच्या अभिनय कारकीर्दीची सुरुवात १९६९ साली वसंत कानेटकर यांच्या 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकाने झाली. डॉक्टर लागूंना रंगभूमीवर येताच यश मिळाले असे झाले नाही. सुरुवातीची त्यांची काही नाटके खूप चालली असेही म्हणता येणार नाही. मात्र दुसऱ्या वर्षी पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'नटसम्राट' हे नाटक रंगभूमीवर आले आणि डॉक्टर लागूंना त्यातील 'अप्पासाहेब बेलवलकर' या पात्राने एक नवी ओळख मिळवून दिली. रसिक प्रेक्षकांनी हे नाटक डोक्यावर घेतलं. रंगभूमीला डॉक्टर लागूंच्या रूपात खरा 'नटसम्राट' लाभला ! मराठी रंगमंचावर विजय तेंडुलकर तसेच अरविंद देशपांडे यांसारख्या अभ्यासू वव्यक्तिमत्वांसोबत काम करून डॉक्टर लागूंनी मराठी रंगभूमीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अभिनय क्षेत्रात वयाच्या ४२ व्या वर्षी डॉक्टरांचा प्रवेश झाला होता. ते पाहता त्यांच्या वाट्याला काही निवडक भूमिकाच आल्या. असे असूनही डॉक्टर लागूंनी मात्र त्यांच्या वाट्याला आलेल्या प्रत्येक भूमिकेचे, त्यांच्या अभिनयाने सोने केले. प्रसिद्ध अभिनेते नसिरुद्दीन शहा त्यांच्या 'सिनेमा के सौ साल' या मुलाखतीत म्हणतात की, मी श्रीराम लागू यांना भारतातील सर्वात महान रंगकर्मी मानतो. इतकंच नव्हे तर मी जगभरातील सर्वोच्च कुशल अभिनेत्यांमध्ये त्यांना ठेवू इच्छितो. दुर्दैवाने त्यांना मिळालेले चित्रपट त्यांना न्याय देऊ शकलेले नाहीत.

१९७२ साली डॉक्टर लागूंना प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' या मराठी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. ' द ब्ल्यू एंजेल्स' या जर्मन सिनेमावरून प्रेरित होऊन हा चित्रपट बनविण्यात आला होता. यातील डॉक्टर लागूंची 'मास्तर' ही व्यक्तिरेखा खूप गाजली. पुढे व्ही. शांतारामांनी हा चित्रपट हिंदीमध्ये प्रदर्शित केला, परंतू त्याला मराठी एवढं यश मिळाले नाही. असे असूनही हिंदीमधील डॉक्टर लागूंची भूमिका प्रभावी ठरली. यानंतर मात्र डॉक्टर लागूंनी कधीही पाठी वळून पाहिले नाही. मराठीसोबतच हिंदी सिनेमांमध्ये त्यांना अनेक कामे मिळत गेली. सुपरस्टार अमिताभसोबत एक सहकलाकार म्हणून त्यांनी अनेकदा भूमिका बजावली आहे. अमोल पालेकर आणि वहिदा रहेमान सोबतचा त्यांचा 'घरोंदा' चित्रपट उल्लेखनीय ठरला. या चित्रपटातील भूमिकेसाठी त्यांना फिल्मफेअर अवॉर्ड देण्यात आले. हिंदीतील त्यांच्या काही खास चित्रपटांमध्ये 'घरोंदा' सोबतच किनारा, इंकार, इंसाफ का तराजू, साजन बिना सुहागन, एक दिन अचानक आणि एक पल या चित्रपटांमधून त्यांनी उल्लेखनीय काम केले. खरे तर हिंदी चित्रपटांमधील प्रमुख भूमिकांसाठी डॉक्टर श्रीराम लागूंचा विचार व्हायला हवा होता, परंतु बॉलीवूडने याबाबत त्यांच्यावर नेहमीच अन्याय केला. हिंदी आणि मराठी चित्रपटांच्या त्यांच्या एकूण कारकिर्दीत त्यांनी जवळजवळ अडीचशे चित्रपटांमधून काम केले.

डॉक्टर लागूंना त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात २००६ मध्ये मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार, १९९७ मध्ये कालिदास पुरस्कार, २००७ मध्ये पुण्यभूषण पुरस्कार, २०१० मध्ये संगीत नाटक अकादमीचा फेलोशिप सन्मान आणि २०१३ मध्ये लाइफ टाइम अचीव्हमेंट अवॉर्ड देण्यात आला. डॉक्टर लागू जसे अभिनेता होते तसेच त्यांच्यात एक लेखकही वसला होता. त्यांनी स्वतःचे जे आत्मचरित्र लिहिले आहे 'लमाण' त्यातून हे सिद्ध होते. ज्या 'नटसम्राट' या नाटकातील नटवर्य अप्पासाहेब बेलवलकरांची मध्यवर्ती भूमिका श्रीराम लागूंनी साकारली त्याच भूमिकेतील एक वाक्य आहे, आम्ही फक्त लमाण, इकडचा माल तिकडे नेऊन टाकणारे. अर्थातच 'लमाण' म्हणजे मालवाहू कामगार. आपल्या अभिनयप्रवासात हे तथाकथित लमाणाचे काम डॉक्टर श्रीराम लागूंनी विलक्षण निष्ठेने, जिद्दीने आणि सचोटीने केले आहे. यातून बहुदा असेच काही त्यांना सुचवायचे असावे!

ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांचे १७ डिसेंबर २००१मध्ये वयाच्या ९२व्या वर्षी पुण्यात वृद्धापकाळानं निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान



### इंस्टाग्रामवर आवडीचेच व्हिडीओ पाहू शकणार

टेक कंपनी मेटाने इंस्टाग्राममधील रील्स फीड अधिक पर्सनलाइज्ड करण्यासाठी नवीन युवर अल्गोरिदम' हे फीचर लॉन्च केले आहे. हे सध्या अमेरिकेत लॉन्च करण्यात आले आहे, लवकरच इतर देशांमध्येही ते रोलआउट केले जाईल.नवीन फीचर वापरकर्त्यांना त्यांच्या रील्स फीडवर पूर्ण नियंत्रण देते. एआयच्या मदतीने वापरकर्ते पाहू शकतील की इंस्टाग्रामचा अल्गोरिदम त्यांच्यासाठी कोणते विषय निवडत आहे.हे तुमच्या आवडीनुसार व्हिडिओ दाखवेल, तसेच तुम्ही स्वतःच विषय जोडू किंवा काढू शकाल. कंपनीचे म्हणणे आहे की, यामुळे शिफारसी अधिक वैयक्तिक होतील, विशेषतः जेव्हा तुमची आवड बदलत राहते.आय तुमची ॲक्टिव्हिटी ॲनालाईज करून तुमच्या आवडीची यादी तयार करेल.



इंस्टाग्रामचा एआय अल्गोरिदम तुमच्या अलीकडील ॲक्टिव्हिटी, जसे की वॉच टाइम, लाईक्स, शेअर्स यांचे विश्लेषण करून तुमच्या सर्वाधिक आवडींची यादी तयार करतो. उदाहरणार्थ, तो असे म्हणू शकतो की तुम्हाला क्रिएटिव्हिटी, स्पोर्ट्स, फिटनेस आणि स्केटबोर्डिंगमध्ये रस आहे. ही यादी एआय जनरेटेड सारांशासह येते, जी तुमच्या आवडी सोप्या शब्दांत स्पष्ट करते.


तुमच्या आवडीचे विषय निवडू शकाल इंस्टाग्राम रील्समध्ये वरच्या-उजव्या बाजूला एक आयकॉन दिसेल. यावर टॅप करताच 'युवर अल्गोरिदम' डॅशबोर्ड उघडेल.

येथे ॲप तुम्हाला एआय च्या मदतीने त्या थीम्स आणि टॉपिक्स दाखवेल जे त्याला वाटते की तुमच्या सर्वाधिक आवडीचे आहेत.

तुम्ही इंस्टाग्रामने निवडलेल्या प्रत्येक थीमवर टॅप करून सांगू शकाल की तुम्हाला ती जास्त पाहायची आहे की नाही. जर कोणताही मनोरंजक विषय यादीत नसेल, तर तुम्ही तो मॅन्युअली जोडू शकाल आणि काढूही शकाल.

तुमच्या आवडीनुसार रील्सच्या शिफारसी वेळेनुसार बदलत जातील. इंस्टाग्रामचे म्हणणे आहे की, ही फक्त सुरुवात आहे. येत्या काही महिन्यांत, 'युवर अल्गोरिदम' रील्सच्या पुढे जाऊन एक्सप्लोर टॅब आणि ॲपच्या इतर विभागांमध्येही उपलब्ध होईल. थ्रेड्स ॲपवरही अशीच काही योजना आहे.

# वसई किल्ला मोहिमेचे शिलेदार चिमाजी अप्पा



## निमित्त

महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगीज वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी यशस्वी मोहीम राबवणारे चिमाजी अप्पा यांचा १७ डिसेंबर स्मृतिदिन. दोन वर्ष झुंज देऊन त्यांनी वसईचा किल्ला जिंकला. साष्टी बेटांवर त्यांनी मराठ्यांची सत्ता स्थापन केली. पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचे पुत्र व बाजीराव पेशव्यांचे धाकटे भाऊ म्हणजे चिमाजी अप्पा. सदाशिवराव भाऊ हे त्यांचे पुत्र होते. वसईच्या लढाईला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे मानण्यात येते. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगिजांच्या तावडीतून सोडवण्याच्या महत्त्वपूर्ण मोहिमेसाठी चिमाजी अप्पा यांची नेमणूक करण्यात आली. ही लढाई जिंकत चिमाजींनी थोरले बंधू बाजीराव पेशवे यांचा विश्वास सार्थ ठरवला.


महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगीज वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी यशस्वी मोहीम राबवणारे चिमाजी अप्पा यांचा १७ डिसेंबर स्मृतिदिन. २ वर्ष झुंज देऊन त्यांनी वसईचा किल्ला जिंकला. साष्टी बेटांवर त्यांनी मराठ्यांची सत्ता स्थापन केली. पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचे पुत्र व बाजीराव पेशव्यांचे धाकटे भाऊ म्हणजे चिमाजी अप्पा. सदाशिवराव भाऊ हे त्यांचे पुत्र होते. वसईच्या लढाईला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे मानण्यात येते. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगिजांच्या तावडीतून सोडवण्याच्या महत्त्वपूर्ण मोहिमेसाठी चिमाजी अप्पा यांची नेमणूक करण्यात आली. ही लढाई जिंकत चिमाजींनी थोरले बंधू बाजीराव पेशवे यांचा विश्वास सार्थ ठरवला. वसईची लढाई जिंकून त्यांनी पोर्तुगीजांचे त्या परिसरातील वर्चस्व नष्ट केले. या मोहिमेत नाट्यमय आणि तेवढ्याच विस्मयजनक घटना घडल्या. १७ फेब्रुवारी १७३९ रोजी मराठ्यांनी चिमाजी अप्पा यांच्या नेतृत्वाखाली खुद्द वसईवर चाल केली. पोर्तुगीजांनी आपली शिबंदी वसईच्या किल्ल्यात घेतली व वसईचा वेढा सुरू झाला.

मराठ्यांनी मोठ्या शिताफीने पूर्ण किल्ल्याभोवती घेरा घातला व किल्ल्याची पूर्ण नाकेबंदी करून टाकली. अत्यंत चिकाटीने चिमाजी अप्पा यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी वसईच्या किल्ल्याला वेढा घातल्यानंतर गनिमी काव्याच्या सहाय्याने त्यांनी किल्ल्यावर हल्ले चालूच ठेवले. या हल्ल्यातच पोर्तुगीजांचा सेनापती सिल्व्हेरा दि मेंझेस मारला गेला. सेनापतीच्या मृत्युपश्चातदेखील पोर्तुगीजांनी लढा सुरूच ठेवला. हातबॉम्ब, बंदुका, उखळी तोफा यांच्या सहाय्याने त्यांनी मराठ्यांचा प्रतिकार चालूच ठेवला. मात्र तरीही मराठ्यांनी आपला वेढा सैल केला नाही. आंग्र्यांच्या आरमाराने समुद्री मार्ग बंद केले होते. तेथूनही रसद मिळणे बंद झाले. त्यानंतर शेवटी १६ मे १७३९ रोजी मराठ्यांनी वसईच्या किल्ल्यावर एल्गार केला. यावेळी चिमाजी अप्पांनी स्वतः पहिली तोफ डागली. त्यानंतर नारो शंकर दाणी यांच्या नेतृत्वाखालील घोडदळ आणि आंग्र्यांचे आरमार यांनी दोन्ही बाजूंनी पोर्तुगीजांवर हल्ला केला.

चहूबाजूंनी होणार्या मराठ्यांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यास अपयश येत असल्याचे पाहून पोर्तुगीजांनी अखेर बचावासाठी शरणागती पत्करली. वसई किल्ल्याच्या यशस्वी मोहिमेनंतर चिमाजी आप्पा स्थानिक जनतेत लोकप्रिय झाले. पेशवा बनणार नाही हे माहीत असूनही ते पेशवाईशी कायमच प्रामाणिक, एकनिष्ठ राहिले. १७ डिसेंबर १७४० रोजी चिमाजी अप्पा यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### फळे, भाज्यांचे सलाड कसे व किती खावे?

फळ आणि भाज्यांचे सलाड खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. ते खाल्ल्याने शरीराला जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरसारखे आवश्यक पोषक घटक मिळत असतात, पण तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार फळे आणि भाज्यांचे सलाड एकत्र खाण्यापूर्वी काही गोष्टीची काळजी घेणे आवश्यक आहे.



रोजच्या जेवणामध्ये भाज्या आणि फळांचा समावेश करण्याचा सल्ला अनेकदा आहार तज्ञ देतात. फळे आणि भाज्या योग्य प्रमाणात खाल्ल्याने त्याचे शरीराला अनेक फायदे होतात. ज्यांना भाज्या आवडत नाही त्यांच्यासाठी सलाड हा एक उत्तम पर्याय आहे. सलाड खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. काहींना फ्रुट सलाड आवडते तर अनेकांना भाज्यांचे सलाड आवडते, पण काहीजण फळ आणि भाज्यांचे सलाड एकत्र खातात. या दोन्ही गोष्टींमध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर, पोटॅशियम, जस्त आणि लोहा सह अनेक पोषक घटक आढळतात. दिल्ली येथील आहारतज्ञ प्रिया पालीवाल यांच्या म्हणण्यानुसार फळे आणि भाज्यांचे सलाड एकत्र खाने हा एक आरोग्यदायी पर्याय आहे. फळे आणि भाज्यांचे सलाड एकत्र खाल्ले तर यामुळे जास्त जीवनसत्वे, खनिजे आणि फायबर मिळतातच, शिवाय त्यासोबतच त्यामध्ये कॅलरीजही कमी असतात. फळे आणि भाज्या दोन्ही आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे, पण त्या खाण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भाज्या आणि फळांचे सलाड एकत्र खाल्याने आरोग्यावर काय परिणाम होतात ते तज्ञांकडून जाणून घेऊ.

डॉक्टर पालीवाल सांगतात की, जर तुम्ही भाज्या आणि फळांचा एकत्रित सलाड खात असाल तर तुम्ही सफरचंद, गाजर आणि शलगम एकत्रित खाऊ शकतात. यामध्ये तुम्हाला भरपूर फायबर आणि व्हिटॅमिन ए मिळेल. ज्यांना मधुमेह आणि किडनीचा आजार आहे त्या रुग्णांसाठी हे अतिशय फायदेशीर ठरेल. फळे आणि भाज्यांचे सलाड बनवण्यापूर्वी ते एकदा स्वच्छ धुऊन घ्या.

तज्ञांच्या म्हणण्यानुसार भाज्या आणि फळे एकत्रित खाण्यापूर्वी काळजी घेणे आवश्यक आहे. काही वेळा त्या आरोग्यास हानी पोहचू शकतात. काही भाज्या आणि फळांमध्ये असे घटक असतात, जे पचनाशी संबंधित समस्या निर्माण करू शकतात. एवढेच नाही तर काही फळे आणि भाज्या एकत्रित सलाडच्या रूपात खाल्ल्याने ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे ते योग्य प्रमाणातच खाण्याचा सल्ला तज्ञांनी दिला आहे.

# लोक अदालत ठरली दिलासादायक

## श्रीवर्धनमध्ये ६९९ प्रकरणांचा निकाल, २४.२० लाखांची वसुली



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथे आयोजित लोक अदालत नागरिकांसाठी दिलासादायक ठरली असून एकूण १७९५ प्रकरणांपैकी ६९९ प्रकरणे यशस्वीरीत्या निकाली काढण्यात आली आहेत. या प्रक्रियेतून एकूण २४,२०,०४९ रुपये इतकी वसुली करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली.

श्रीवर्धन न्यायालयात प्रलंबित असलेल्या २०३ प्रकरणांचा समावेश लोकन्यायालयात करण्यात आला होता. त्यापैकी ५८ प्रकरणे निकाली निघून १०,४४,३६५ रुपयांची वसुली झाली आहे.तसेच प्री-लिटिगेशन अंतर्गत दाखल १५९२ प्रकरणांपैकी ६४१ प्रकरणे निकाली निघाली असून त्यामधून १३,७५,६८४ रुपये वसूल करण्यात आले.

या लोक अदालतच्या यशस्वी आयोजनात प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी समीर शेख, वकील संघटनेचे पदाधिकारी व सदस्य राजेश वावेकर, स्वानंद दातार, अतुल चौगुले, मनीष लाड, संतोष सापते, विठोबा पाटील, गोदावरी करडे, शैलेश चांदोरकर, तेजस ठाकूर, आंबिका करडे, तसेच न्यायालयीन कर्मचारी व पक्षकारांनी मोलाची भूमिका बजावली.

यावेळी बोलताना न्यायाधीश समीर शेख यांनी सांगितले की, लोकन्यायालयाच्या माध्यमातून वाद-विवादांचे सोप्या, जलद व परस्पर संमतीने निराकरण होते. त्यामुळे वेळ, खर्च आणि मानसिक ताण वाचतो. नागरिकांचा लोक अदालतला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, ही सकारात्मक बाब आहे.लोक अदालत ही न्यायप्रवेश सुलभ करणारी प्रभावी यंत्रणा असून, वाढत्या प्रलंबित प्रकरणांवर मात करण्यासाठी ती अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

## खालापूर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजद्वारे आरोपींना केली अटक



**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर चोरीची घटना घडली होती. त्याचा पाठपुरावा खालापूर पोलिसांनी केला असता सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत त्याची पाळेमुळे मुंबई डोंगरी परिसरात असल्याची माहिती मिळताच पोलीस पथकाने तेथून आरोपींना ताब्यात घेतले व त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

९ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई-पुणे हायवेवर माडप बोगद्याजवळ फिर्यादी यांचे ताब्यातील माल वाहतूक ट्रकने प्रवास करत असताना अज्ञात चोरटा चालत्या ट्रकमध्ये चढून ३२,४०० किमतीचा अल्युमिनियम आलोयन्स इंगोट्स या मालातील ४५ नग खाली रस्त्यावर टाकले. मागील वाहनाने अज्ञात व्यक्ती ते जमा करत असल्याचे आढळून आले.
सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे उपनिरीक्षक अशोक जगताप व गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी बातमीदार यांच्या मदतीने अर्जुन शंकर काळे (वय ३२, रा, वाडीबंदर, डोंगरी, मुंबई), सोहेल रहीम खान (वय ४०, रा. वाडीबंदर, ब्रीजखाली डोंगरी, मुंबई) हे दोघेही चारनळ चौक, डोंगरी, मुंबई येथे गुन्ह्यात वापरलेल्या वाहनासह मिळून आले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गुन्हा कबूल केला.

त्यांचे सोबत असलेले साथीदारबाबत विचारपूस केली असता त्यांनी संतोष रतन काळे (रा. वाडीबंदर डोंगरी) व उम्मी (पूर्ण नाव माहित नाही) तसेच दोन्ही साथीदार कुठे आहेत व चोरीचा मुद्देमाल कुठे लपवला आहे याबाबत उडवाउडवीचे उत्तरे दिली. दोघांना अटक करण्यात आली. सध्या ते कोठडीत आहेत.
गुन्ह्यातील गेलेला माल हा घासबंदर माजगाव मुंबई येथील भंगार दुकान मालक मोहम्मद मुजफ्फर कलील मिस्त्री याचेकडून व उर्वरित माल हा गुन्ह्यात वापरलेल्या इको कारसह जप्त करण्यात आला आहे. दोन फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

## आगीमध्ये घर जळालेल्या कासारे कुटुंबाला मंत्री भरत गोगावले यांचा मदतीचा हात

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील कांबळे तर्फे महाड ( इसाने कांबळे ) गावातील बौद्धवाडी मधील चंद्रकांत लक्ष्मण कासारे यांच्या घराला आग लागून मोठी दुर्घटना घडली होती. संपूर्ण संसार उद्ध्वस्त झालेल्या या कासारे कुटुंबाला मंत्री भरत गोगावले यांनी पंन्नास हजारांचे सहकार्य करुन मदतीचा हात दिला आहे.



दिनांक ११ डिसेंबर रोजी चंद्रकांत कासारे यांच्या घराला आग लागली होती. या आगीमध्ये कासारे यांच्या घरातील संपूर्ण साहित्य आणि अन्नधान्य संपूर्णपणे जळून गेलं होतं. या दुर्घटनेत शेतकऱ्याचे जवळपास दोन ते अडीच लाखांचे नुकसान या आगीमध्ये झाल्याचं समजले. या दरम्यान मंत्री भरत गोगावले हे हिवाळी अधिवेशनात असल्याने त्यांच्या सौभाग्यवती माजी जिल्हा परिषद सदस्य सुषमाताई गोगावले यांनी बौद्ध वाडी मध्ये कासारे कुटुंबाच्या मदतीसाठी धावून गेल्या व प्रशासनाला योग्य ते सहकार्य करण्याच्या सुचना केल्या.

नागपुर येथील अधिवेशन आटोपून येताच मंत्री भरत गोगावले कासारे कुटुंबाची भेट घेत पंन्नास हजारांची आर्थिक मदत केली. तसेच शासनाकडून कासारे कुटुंबाला नुकसान भरपाई लवकर मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. मंत्री भरतशेठगोगावले यांनी केलेली मदत आमचा संसार उभा करण्यासाठी बहुमूल्य असल्याचे कासारे कुटुंबानी म्हटले आहे.

## आगरी समाज संस्थेतर्फे आयोजित रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद

**अलिबाग :** रायगड जिल्हा रक्तपेढी अलिबाग, आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्यातर्फे व कच्छ युवक संघ व लायन्स क्लब अलिबाग यांच्या सहकार्याने रविवारी (दि. १४) कच्छी भवन, श्रीबाग - अलिबाग येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ५० बाटल्या रक्त संकलन करण्यात आले.

या शिबिरात आगरी समाज संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील, सचिव प्रभाकर ठाकूर, ज्येष्ठ सदस्य जयवंत थळे, मेहुल पाटील तसेच नयन कवळे, महेंद्र पाटील, भावेश पटेल यांनी स्वतः रक्तदान करून नवीन रक्तदात्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपाध्यक्ष सुनील तांबडकर, खजिनदार ड. सचिन पाटील, उदय म्हात्रे, राजेंद्र पाटील, वैभव पाटील, मनोहर पाटील, बिपीन टेमकर, श्रेयस ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले.



## गागोदे बुद्रुक येथे 'माझी शाळा माझा अभिमान'

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा गाग़ोदे बुद्रुक तालुका पेण या शाळेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत माझी शाळा माझा अभिमान उपक्रमात माजी विद्यार्थी मेळावा रविवार दिनांक (१४) रोजी आयोजित करण्यात आला सुरुवातीला माजी विद्यार्थ्यांचे शाळेतील मुलांनी लेझीम खेळून व स्वहस्ते केलेल्या वेलकम ग्रीटिंगने स्वागत करण्यात आले

शाळेचे माजी विद्यार्थी भरत महाडिक यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापिका



वैशाली येलवे यांनी सदर कार्यक्रमाचा उद्देश लोकसहभागातून शाळेचा सर्वांगीण विकास शाळेची प्रगती व विकास यासंबंधीची माहिती आपल्या प्रस्ताविकात सांगितले शाळेच्या सहशिक्षिका स्मिता पाटील यांनी लोकसहभागातून शाळेला अपेक्षित असणाऱ्या बाबी सांगितल्या

## धावत्या ट्रेनमध्ये महिलेची प्रसूती; कन्यारत्नाचा जन्म

**कर्जत : प्रतिनिधी**

रेल्वेचा प्रवास रात्रीची वेळ अचानक एका गर्भवती महिलेच्या वेदनांनी डब्यात घबराट पसरली. सोलापूर - मुंबई धावणाऱ्या सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये घडलेला हा प्रसंग केवळ वैद्यकीय नव्हे, तर माणुसकीचा जिवंत दाखला ठरला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सोरेगाव येथील गर्भवती महिला दीक्षा बनसोडे ठाणे येथे येण्यासाठी सोलापूरहून निघाल्या होत्या. पुणे नंतर कर्जत स्थानक सोडल्यानंतर अचानक त्या महिलेला तीव्र प्रसूती वेदना सुरू झाल्या. परिस्थिती गंभीर होत चालली होती. घाबरलेल्या प्रवाशांमध्ये एकच प्रश्न होता. आता काय? या डब्यात प्रवास करणारे सायन येथील



स्त्रीरोगतज्ञ डॉ. प्रशांत बोडगे यांनी क्षणाचाही विलंब न करता पुढाकार घेतला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी रेल्वे हेल्पलाईनशी संपर्क साधला. नेरळ स्थानकात कर्तव्यावर असलेले रणजीत कुमार शर्मा यांनीही प्रसंगाचे गांभीर्य ओळखत तात्काळ समन्वय साधला. दरम्यान महिलेला वेदना इतक्या वाढल्या की स्थानकावर उतरणे शक्यच नव्हते. ट्रेन कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानक दरम्यान असताना क्षणभरही न डगमगता इथेच प्रसूती करावी लागेल असा धाडसी निर्णय डॉक्टरांनी घेतला.

रेल्वेच्या त्या चालत्या डब्यात, मर्यादित साधनांमध्ये प्रचंड ताणतणावात एक गोंडस कन्यारत्न जन्माला आले. डब्यात क्षणातच शांतता पसरली आणि मग ऐकू आला नवजात बाळाचा रडण्याचा आवाज. धैर्य आणि माणुसकी खऱ्या अर्थाने 'देव' ठरली.

## कोकण फेस्टिव्हल : आनंदमेळ्यासह नवोदितांना प्रोत्साहन

**माणगाव : बातमीदार**

माणगांव शहरात गांधी मैदानात कोकणातील सांस्कृतिक वैभव, मनोरंजन आणि स्पर्धात्मक कार्यक्रमांची रेलचेल अनुभवण्यासाठी माणगांव कोकण फेस्टिव्हल २०२५ चे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. दि. १२ ते २२ डिसेंबर या ११ दिवसांच्या कालावधीत चालणाऱ्या या फेस्टिव्हलमध्ये आवडत्या सेलिब्रेटींची उपस्थिती, स्थानिक कलाकारांना व्यासपीठ, विविध स्पर्धा व दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे.



या फेस्टिव्हलचा शुभारंभ शुक्रवार, दि. १२ डिसेंबर रोजी रात्री महाराष्ट्राच्या ज्येष्ठ सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. अलका कुबल आठल्ये आणि हसताय ना, हसायलाच पाहिजे! म्हणत महाराष्ट्रातील रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे चला हवा येऊ द्या फेम अष्टपैलू सूत्रसंचालक डॉ. निलेश साबळे यांच्या उपस्थितीत झाले .यावेळी माणगांव नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, ज्येष्ठ समाजसेवक संजयअण्णा साबळे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण दळवी, समाजसेविका सुवर्णाताई जाधव, कॅप्टन निर्मल सिंग रांधवा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या फेस्टिव्हलचा उद्देश स्पष्ट करताना आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले की, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळावे, सांस्कृतिक व नाट्य चळवळ कायमस्वरूपी रुजावी व वाढावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. यामध्ये शरीर सौष्ठव स्पर्धा, कोकण सुंदरी स्पर्धा, शॉर्ट फिल्म्स, विद्यार्थ्यांसाठी विविध गुणदर्शन स्पर्धा, तसेच महाराष्ट्राची आवडती लावणी नृत्यप्रकार आणि प्रसिद्ध सेलिब्रेटी नृत्यांगना गौतमी पाटीलचा नृत्याविष्कार ही विशेष आकर्षणे असणार आहेत. याशिवाय विनोदाचा बादशहा भाऊ कदम यांचे ऑल द बेस्ट हे नाटक प्रत्यक्ष पाहण्याची मेजवानीही रसिक प्रेक्षकांना मिळणार आहे, अशी माहिती प्रस्ताविकात डॉ. अजय मोरे यांनी दिली.

या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार रविंद्र कुवेसकर व निलिमा काप यांनी सेलिब्रेटी अभिनेत्री अलकाताई कुबल आठल्ये आणि डॉ. निलेश साबळे यांच्याशी साधलेली बोलकी प्रकट मुलाखत रसिक प्रेक्षकांना विशेष भावली.

यावेळी निलेश साबळे यांनी सूत्रसंचालन करताना हसताय ना? असे विचारले असता, प्रेक्षकांमधून हसायलाच पाहिजे! असा आवाज आला आणि तीच ओळ पुढे कार्यक्रमाची ओळख ठरली, असे सांगितले. क्रिकेटची आवड असून लक्ष्मीकांत बेर्डे हे आपले आवडते अभिनेते असल्याचेही त्यांनी नमूद केले. परदेशातही हा कार्यक्रम पाहिला जातो, अनोळखी परदेशी लोक आपल्याला ओळखतात, हा अनुभव त्यांनी रसिकांशी शेअर केला.

फिटनेसचे रहस्य म्हणजे सतत प्रेक्षकांना हासवणे असून, पुढेही हासवत राहण्याचा नववर्ष संकल्प करत त्यांनी आपण या क्षेत्रात नसतो तर डॉक्टरकीच केली असती, असे उच्चशिक्षित आयुर्वेदिक डॉक्टर असलेल्या डॉ. साबळे यांनी सांगितले.

ज्येष्ठ अभिनेत्री अलकाताई कुबल यांनी वयाच्या ८व्या वर्षी बालकलाकार म्हणून अभिनयाची सुरुवात केल्याचे सांगत, इयत्ता दहावीत असतानाच 'चक्र' या चित्रपटातून व्यावसायिक अभिनेत्री म्हणून पदार्पण केल्याचा संपूर्ण प्रवास उलगडला. अशोक (मामा) सराफ, दादा कोंडके, लक्ष्मीकांत बेर्डे यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम केल्याचे त्यांनी सांगितले. मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री रंजना देशमुख या आपल्या आवडत्या नायिका असल्याचे सांगत, मात्र त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली नाही, अशी खंत व्यक्त केली.

मी रत्नागिरीची असून माहेर-सासर कोकणातच आहे. येथे येऊन खूप आनंद झाला, असे त्यांनी नमूद केले.शेवटी, नवोदितांना संधी व प्रोत्साहन देणाऱ्या या अकरा दिवसांच्या कोकण फेस्टिव्हलचा माणगावकरांनी पूर्ण आनंद घ्यावा व भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करताना अलकाताई कुबल यांनी आयोजक श्री. व सौ. हितेन छेडा, डॉ. अजय मोरे व सौ. अंकीता अजय मोरे यांचे तोंडभरून कौतुक केले.

## यंदा माथेरानमध्ये गुलाबी थंडी कमी

**माथेरान : बातमीदार**

उंच गिरीशिखरावर वसलेले सुप्रसिद्ध माथेरान पर्यटन स्थळी थंडीचा जोर फारच कमी अनुभवयास मिळत आहे.यंदाच्या वर्षी माथेरानची गुलाबी थंडी फार कमी झाली असल्याचे पर्यटकांमधून बोलले जात आहे.

थंड हवेचे ठिकाण अशी ख्याती असलेले,प्रदूषण मुक्त असे महाराष्ट्रातील सुंदर पर्यतान्स्टस्थळ म्हणजे माथेरान,दरवर्षी या डोंगरमाथ्यावर पर्यटकांची मोठी मांदियाळी पाहवयास मिळते.तिन्ही ऋतूंमध्ये पर्यटक माथेरान येथे मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.या पर्यटनस्थळी डिसेंबर महिन्यात थंडीचे प्रमाण अधिक असते मात्र यंदाच्या वर्षी माथेरान मधील गुलाबी थंड हवेचे प्रमाण काही प्रमाणात कमी जाणवत असल्याचे बोलले जात आहे.

माथेरान जवळील भागात थंडीच्या प्रमाणात अधिक नोंद होत असून माथेरान शहरात मात्र १५ ते १७ अंश इतकीच नोंद होत असल्याचे समजते. प्रत्येक विकेंडला येणाऱ्या पर्यटकांकडून माथेरानची थंडी आता कमी झाली असे बोलले जात आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ८६/३/ब | ०-३३-३० | १.७५ | भगवान काशिनाथ पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १६/१२/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. ता. पनवेल जि. रायगड, मो.क्र. : ९९३०३६९८६१



### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका खालापूर पैकी गाव वडवळ येथील **श्री. दगडु आबा उर्फ आबाजी सावंत यांचे मालकीची भूमापन क्रमांक ७२अ/१/अ/४१, क्षेत्र ०-२७-३० हे. आर. पॉ.** ही मिळकत आमचे अशिल **मे. बेकबेस्ट फूड्स प्रा. लि. वडवळ,** तालुका खालापूर, जिल्हा रायगड यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे व त्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी सुरू आहेत असे त्यांनी सांगितले आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीनंतर आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**तारीख १६/१२/२०२५**

**सही /-**
**ॲड. श्रीराम प्रमोद ठोसर**
मु. बी -४ लक्ष्मी व्हीला सोसायटी, ब्राह्मण आळी, अलिबाग तालुका अलिबाग, जिल्हा रायगड ई-मेल : spthosar1990@gmail.com

# गव्हाण फाटा येथील पुलाच्या कामास गती द्या; प्रवाशांची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

पूर्व विभागाला जोडणाऱ्या गव्हाण फाटा– चिरनेर दरम्यानच्या मालगाडी रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड जुन्या पुलाच्या दुरुस्तीचे काम मागील तीन वर्षभरापासून रखडले आहे. त्यामुळे या दररोज प्रवास करणाऱ्या पाच हजार प्रवासी वाहनांना दोन किमी अंतरापर्यंत वळसा घालून चिर्लेमार्गाने प्रवास करावा लागत आहे. तसेच अनेक वाहने जेएनपीए ते पळस्पे राष्ट्रीय महामार्गावरून विरुद्ध दिशेने धोकादायक प्रवास करीत आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय प्रवासी आणि वाहनचालकांची होत आहे.



जेएनपीए बंदरातून देशभरात कंटेनर मालाची वाहतूक करणाऱ्या रेल्वे मार्गावरील धोकादायक ओव्हरहेड पुल पाडण्यात आला आहे. पाडण्यात आलेल्या या ओव्हरहेड पुलाच्या दुरुस्तीचे काम मागील तीन वर्षांपासून सुरू आहे. पनवेल, मुंबई, नवी मुंबई व ठाण्यासह इतर मार्गाकडे जाणारा व उरण पूर्व विभागाशी जोडणारा गव्हाणफाटा – चिरनेर रस्त्यावरुन दररोज पाच हजारांहून अधिक वाहने आणि प्रवासी प्रवास करीत होते, मात्र मध्य रेल्वेच्या कंटेनर मालाची वाहतूक करणारा ओव्हरहेड जुना पुल वाहतूकीसाठी धोकादायक बनला होता. त्यामुळे जुना ओव्हरहेड पुल बंद करून व तोडून त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

या नव्याने ओव्हरहेड पुलाच्या बांधकामासाठी या मार्गावरून ये–जा करणाऱ्या वाहनचालकांची व प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे, परंतु पर्यायी रस्ता वाहनांना गव्हाणफाटा सर्कलवरून सुमारे दिड किलोमीटरचा वळसा घालून चिर्लेमार्गावरुन प्रवास करावा लागत आहे. तर चिरनेर मार्गांवरून येणाऱ्या वाहनांना पनवेलकडून येणाऱ्या महामार्गाच्या उलट्या धोकादायक मार्गातून वळसा घेऊन गव्हाणफाटा मार्ग गाठावा लागत आहे. गव्हाणफाटा–चिरनेर मार्गांवरील रेल्वे पुलाच्या अडथळ्यामुळे उरण तालुक्यातील जांभूळपाडा, वेश्वी, दिघोडे या गावाची एसटी बससेवा बंद झाली आहे.

या मार्गांवर अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच हा पर्यायी रस्ता प्रवासी रिक्षा, मॅजिक रिक्षा आणि अन्य वाहनांसाठी धोकादायक ठरू लागलेला आहे. सर्वासाठी खार्चिक ठरलेला पर्यायी रस्ता बाजारहाट व अन्य कामांसाठी पनवेल, नवी मुंबई मार्गाकडे जाण्यासाठीही गैरसोयीचा ठरू लागला आहे. त्यामुळे या मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम मध्य रेल्वे प्रशासन पुर्ण करण्याची अपेक्षा नागरिकांना होती, मात्र मागील तीन वर्षभरापासून सुरू करण्यात आलेल्या मालवाहू रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम रखडत रखडत सुरू असल्याने प्रवासी व वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होऊ लागली आहे. यामुळे प्रवासी आणि वाहन चालकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत संबंधित विभागाकडून विचारुन माहिती देतो, अशी प्रतिक्रिया मध्य रेल्वे प्रशासनाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

# मुंबई, नवी मुंबईतील ३६ प्रदूषित ठिकाणांची पाहणी

## उच्च न्यायालयात अहवाल सादर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह आसपासच्या परिसरातील वाढत्या वायू प्रदूषणाचा आढावा घेण्यासाठी न्यायालयाने गठीत केलेल्या पाच सदस्यीय समितीने ६ ते १३ डिसेंबर या कालावधीत मुंबई आणि नवी मुंबईतील ३६ ठिकाणांना भेट देऊन तेथील प्रदूषणाची स्थिती विशद करणारा अहवाल सोमवारी उच्च न्यायालयात सादर केला. त्यावेळी, नवी मुंबई विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण असल्याचे वृत्त प्रसिद्ध होत असून या परिसराला समितीने भेट दिली का? अशी विचारणा न्यायालयाने केली.

त्याचवेळी, समितीच्या या अहवालाचा प्रकरणाशी संबंधित सर्व पक्षकारांनी अभ्यास करावा आणि या समस्येला आळा घालण्यासाठी ठोस उपाय सुचवावेत, असे आदेश मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दिले. या प्रकरणी मुंबई महापालिका आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) प्रतिज्ञापत्र दाखल केली आहेत, परंतु प्रतिज्ञापत्र दाखल करत राहण्याऐवजी उत्तरदायित्व महत्त्वाचे असल्याचे नमूद करून चांगले नागरिक होऊन या प्रकरणी कायमस्वरूपी तोडगा काढण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.



तत्पूर्वी, न्यायालयाच्या आदेशानुसार, २८ नोव्हेंबरला गठीत केलेल्या स्वतंत्र समितीने वायू प्रदूषण आणि हवेचा दर्जा घसरलेल्या (एक्यूआय) मुंबई आणि नवी मुंबईतील ३६ ठिकाणांची पाहणी केली. त्यामध्ये रेडिमिक्स प्रकल्पांह बांधकामाधीनस्थळांचा समावेश असल्याची माहिती प्रकरणातील न्यायालयीन मित्र (अमाकस क्युरी) वरिष्ठ वकील दरायस खंबाटा यांनी न्यायालयाला दिली. समितीने पाहणीनंतर संबंधित महापालिका अधिकाऱ्यांसोबत बैठकाही घेतल्याचे खंबाटा यांनी न्यायालयाला सांगितले. त्याची दखल घेऊन न्यायालयाने उपरोक्त टिप्पणी केली.

वाढत्या वायू प्रदूषणामुळे मुलाला श्वसनाचा त्रास होत असून प्रदुषणामुळे मुलाच्या फुफ्फुसांची योग्य वाढ होत नसल्याची माहिती एका एक वर्षाच्या मुलाच्या आईने हस्तक्षेप याचिकेद्वारे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. याचिकेची दखल घेऊन मुलाला वैद्यकीय मदत देण्यात येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यावर मदतीसाठी आपण ही याचिका केलेली नाही. परंतु, वायू प्रदूषणामुळे लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येत आहे, असे मुलाच्या आईची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, ते रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे आदेश देण्याची मागणी केली. त्याची दखल घेऊन वायू प्रदुषणासारख्या गंभीर समस्येला आळा घालण्यासाठी नियमांचे पालन आणि देखरेख हेच दोन महत्वाचे मुद्दे असल्याचा पुनरुच्चार खंडपीठाने केला.

# पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे स्नेहसंमेलन उत्साहात



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी. पी.खारपाटील एज्युकेश सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील या विद्या संकुलनात वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विद्या संकुलनात शनिवारी (दि.१३) वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगभूत कला गुणांचे सादरीकरण करून उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पी.पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व श्रीफळ वाढवून करण्यात आले.

या वेळी संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासन अधिकारी व्ही.ए.पाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर,कार्याध्यक्ष विजय पवार, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका तसेच मराठी व इंग्रजी माध्यमातील सर्व शिक्षकांवृंद यांच्यासह कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# नवी मुंबई पालिकेच्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकांकरिता प्रभागनिहाय अंतिम मतदार यादीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे.



यानुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या १५ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, संबंधित विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या https://www.nmmc.gov.in या संकेत स्थळावर आणि सोशल मिडीयावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या ९ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीकरिता मतदार यादीची प्रत (अंतिम मतदार यादी) (फोटोसह) प्रतिपृष्ठ रु. २/– (रुपये दोन फक्त) इतका दर आकारून उपलब्ध करून देता येईल असे म्हटले आहे तसेच मतदारांकरीता नाव शोधण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाच्या https://mahasecvoterlist.in/ वेबसाईटवर Search name in voter list या टॅबमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, याची नोंद घेण्यात यावी, असे आवाहन पालिकेने केले आहे.

# तुराडे येथे घरपट्टी, पाणीपट्टी थकबाकीधारकांना ५० टक्के सूट

## ग्रामसभेत ठरावास मंजुरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत रसायनी तील तुराडे ग्रामपंचायतिने ग्रामसभेत गावातील अनेक थकबाकीदार थकीत असल्याने सदर योजनेचे बाबतीत ग्रामपंचायत अधिकारी अस्मिता मोकळ यांनी वाचन केलं असता सरपंच रंजना गायकवाड व उपसरपंच मालती वाघमारे यांच्यासहित सर्व सदस्यांनी सदर ठरावास मंजुरी दिली.

या योजने अंतर्गत मागील घरपट्टी व पाणी पट्टीसहित चालू घरपट्टी व पाणीपट्टी भरणे आवश्यक आहे. सदरची सूट फक्त निवासी संकूलास घरपट्टी आणि पाणी पट्टीवर लागू असेल. त्यामुळे अनेक थकबाकी धारकांना दिलासा मिळाला. सदर योजनेची मुदत हि ३१, डिसेंबर, २०२५पर्यंतच लागू असल्याने जास्तीत जास्त लोकांनी या योजनेचा फायदा घ्यावा असे ग्रामपंचायतिच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे.

# घणसोलीत क्रीडा दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

मदर टेरेसा कॉन्व्हेन्ट स्कूल नवी मुंबई विद्यालय, गजानन महाराज माध्यमिक विद्यालय,जीजामाता सेकंडरी कॉन्व्हेंट स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, घणसोली यांच्यातर्फे वार्षिक क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.




कार्यक्रमात विद्यार्थ्यांमधील क्रीडाभाव, संघभावना आणि निरोगी स्पर्धेचा उत्कृष्ट परिचय झाला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून सीनियर पी.आय. सचिन गवळी, एच.सी शिवानंद पाटील, मुख्याध्यापिका सपना गुप्ता व महिला पोलीस समितीमधून गौरी दिघे तसेच गजानन चारिटेबल संस्थेचे सचिव डॉ. व्ही. टी. पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमात शाळेचा गौरव वाढवणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका वंदना धुलधुले आणि जयप्रभा गायकवाड यांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांना पुढेही उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करत राहण्याचे प्रोत्साहन देण्यात आले.

# रसायनीत गतिरोधकांना पांढरे पट्टे नसल्याने अपघातांना निमंत्रण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी–आपटा रस्त्यावरील गुळसुंदे येथील तुंगारतन विद्यालयासमोरील रस्त्यावरील गतिरोधकांना पांढरे पट्टे नसल्याने अपघातांची मालिका सुरुच आहे. वाहन चालवत असताना हे गतिरोधक दिसत नसल्याने वाहने सुसाट जात असताना गतिरोधकावरून आदळून अपघात होत आहेत.



रसायनीहून गुळसुंदेकडे जाताना तसेच आपटाहून रसायनीकडे येताना वाहनचालकांना या रस्त्यावरील गतिरोधक दिसेनासे होतात, परिणामी अनेकवेळा या मार्गावर अपघात होत असतात. त्यामुळे वाहतूककोंडीदेखील होते. वाहने आपटल्याने चारचाकी, दुचाकीस्वार जखमी होत आहेत. वाहन चालविताना या रस्त्यावरील गतिरोधक दिसत नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने या गतिरोधकांना पांढरे पट्टे मारावेत, अशी मागणी प्रवासी नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

# 'स्टर्लिंग'तर्फे आविष्कार संशोधन अधिवेशन

**नवी मुंबई : बातमीदार**

एनसीआरडी स्टर्लिंग इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नेरुळ, नवी मुंबई यांनी मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने २०वे आविष्कार २०२५ –आंतरमहाविद्यालयीन / संस्था / विभागीय संशोधन अधिवेशन (झोनल फेरी – झोन XI) १३ डिसेंबर २०२५ रोजी यशस्वीरीत्या आयोजित केले.

या कार्यक्रमास डॉ. सुनील पाटील (संचालक, विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ), डॉ. रजनी अथवाले, डॉ. मीनाक्षी गुरव (ओ.एस.डी., आविष्कार, मुंबई विद्यापीठ), डॉ. तबस्सुम खान (झोन समन्वयक), डॉ. प्रज्ञा कोरलेकर (सह–झोन समन्वयक) तसेच मान्यवर परीक्षक, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.



या स्पर्धेत १०८८ विद्यार्थ्यांनी सादर केलेली ३६२ संशोधन पोस्टर्स प्रदर्शित करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. गौरी पलसोकर, डॉ. अर्चना गोरले व डॉ. दीपक पोखरकर यांनी केले.

# रसायनीत डिजिटल तंत्रज्ञान विकास कार्यशाळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा रसायनी येथील महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे AICTE-ATAL अकॅडमी समर्थित Recent Trends and Digital Techniques in Manufacturing Systems उत्पादन प्रणालींतील आधुनिक प्रवाह आणि डिजिटल तंत्रज्ञान या दोन आठवड्यांच्या प्रगत शिक्षक विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



डॉ. गजेंद्र पाटील, विभागप्रमुख व एफडीपी सह–समन्वयक यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. एम. डी. नडार यांनी एफडीपीचे उद्दिष्टे व कार्यक्रम रचना सादर केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश बाकल यांनी भाषण केले.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी माजी AICTE अध्यक्ष व VJTI मुंबईचे माजी प्राध्यापक डॉ. एस. एस. मंथा होते. त्यांनी 'डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग सिस्टम्स'वरील आपले प्रभावी विचार मांडत इंडस्ट्री ४.० मधील बदलत्या प्रवाहांची दिशा स्पष्ट केली

१ डिसेंबर २०२५ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित या कार्यशाळेत नामवंत तज्ज्ञ वक्त्यांनी विचार मांडले. या कार्यशाळे दरम्यान IIT, Mumbai, BARC, Somaiya University, Schneider Electric, Siemens आदी संस्थांतील तज्ञांनी Industry 4.0, Digital Twin, Automation, AIAML, Cybersecurity, IIoT अशा विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या आठवड्यात रेनॉन्सन्स, क्रिस्टल सिंडिकेट, जय प्रिसिजन, जे. एस. डब्लु स्टील अशा विविध कंपन्यांना औद्योगिक भेटी देऊन सहभागी प्राध्यापकांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेची, आधुनिक यंत्रसामग्रीची तसेच औद्योगिक समस्या निवारण पद्धतींची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली. या भेटींमुळे Industry ४.० तंत्रज्ञानांचा वास्तव उद्योगांमध्ये कसा वापर होतो याची सखोल समज सहभागींना झाली.

यासाठी महाविद्यालय व्यवस्थापनातर्फे डॉ. के एम. वासुदेवन पिल्लई (Chairman and CEO), डॉ. डॅफनि पिल्लई (सेक्रेटरी–MES), डॉ. प्रियम पिल्लई (COO-MES), फ्रनव पिल्लई (Dy. CEO-HOCL Campus) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# 'शिवसंकल्प'च्या नवीन कार्यकारिणीची निवड

**उरण : बातमीदार**

विविध व्यासपीठावर आपल्या समालोचन आणि निवेदनातून जनजागृती आणि समाजप्रबोधन करणाऱ्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशनची वार्षिक सभा चिरनेर येथे नुकतीच झाली.

आपल्या समालोचन निवेदनाच्या मिळणाऱ्या मानधनातून काही रक्कम स्वइच्छेने असोसिएशनकडे जमा करून १० वी नंतर गरिबीमुळे शिक्षण घेण्यास असमर्थ असणाऱ्या व ११ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक अर्थसहाय्य, गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत, शाळांना संगणक, प्रिंटर अशी शैक्षणिक उपकरणे, अपंगांना व्हील चेअर, सायकल, शाळांना ब्लूटूथ स्पीकर, असे सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या असोसिएशनची नवीन कार्यकारिणी निवड या सभेत करण्यात आली.



असोसिएशनच्या अध्यक्षपदी राजेंद्र भगत– चिरनेर यांची बिनविरोध निवड करण्यात आली तसेच उपाध्यक्षपदी हेमाली म्हात्रे – कोप्रोली, यांची तर सचिव पदी सुनिल वर्तक यांची फेर निवड करण्यात आली. खजिनदार पदी पिंट्या घरत– जांभूळपाडा तसेच मिडिया प्रमुख म्हणून विठ्ठल ममताबादे–उरण आणि सल्लागार म्हणून नितेश पंडित मोठीजुई या सर्व पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली.

प्रास्ताविक सचिव सुनिल वर्तक यांनी केले तर मावळते अध्यक्ष आणि नवनियुक्त सल्लागार नितेश पंडित यांनी असोसिएशनच्या आजपर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला.

# चारचाकी वाहनांच्या क्रमांकांसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे चारचाकी वाहनांसाठी चालू असलेली MH46DA ही मालिका संपुष्टात येणार असल्याने MH46DF ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. यासाठी ज्यांना चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी २३ डिसेंबर २०२५ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी २.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे.

एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन २४ डिसेंबर २०२५ रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी २.३० वाजेपूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रकमेचा धनाकर्षण (DD) बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा अतिरिक्त धनाकर्षण कमीत कमी ३०१ रुपयांचा असावा त्यापेक्षा कमी रकमेच्या धनाकर्षण विचार केला जाणार नाही. या अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

धनाकर्षण (DD) RTO PANVEL यांच्या नांवे नॅशनलाईज्ड/शेड्युल्ड बँकेचा असावा, तो दोन महिन्यांपेक्षा जास्त जुना नसावा. अर्जदाराने अर्जासोबत पॅनकार्ड व आधारकार्ड साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा धनाकर्षण (DD) (फक्त एकच) या सिलबंद पाकीटात जमा करावा. आकर्षक क्रमांकासाठी आलेल्या अर्जासोबत असणारे धनाकर्षण अर्ज स्विकारणाऱ्या दिवसापासून दोन महिन्यापेक्षा जुने असलेले धनाकर्षणाचे अर्ज बाद केले जातील. तसेच विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे असलेले धनाकर्षण (DD) सुद्धा बाद केले जातील. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकार जमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही.

आगाऊ प्रक्रियेमध्ये स्विकारलेल्या अर्जाच्या धनाकर्षणच्या पावत्या, जुन्या मालिकेतील पूर्ण नंबर संपल्याशिवाय नवीन मालिकेतील पावत्या जारी केल्या जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

# प्रशासन गाँव की ओर मोहीम प्रभावीपणे राबवा -जिल्हाधिकारी



**रायगड : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १९ ते २५ डिसेंबर २०२५ दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहांतर्गत 'प्रशासन गाँव की ओर' मोहीम राबविण्यात येणार आहे. यासप्ताहांतर्गत 'प्रशासन गाव की ओर' हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा आणि नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दृरदूश्यप्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करतांना जावळे यांनी सांगितले की या 'सुशासन सप्ताह-प्रशासन गाँव की ओर' मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी आराखडा तयार करावा. आपले सरकार पोर्टलवर प्रलंबित तक्रारींचा निपटारा करून घ्यावा. केंद्र शासनाची ही महत्त्वाकांक्षी मोहीम जिल्ह्यात यशस्वीपणे राबवावी.

या मोहिमेदरम्यान विभागांनी अभिनव उपक्रम राबवावेत तसेच या मोहिमेला विशेष प्राधान्य देवून नियोजन करावे, असे निर्देश श्री.जावळे यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. याच अनुषंगाने २३ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा नियोजन भवन अलिबाग येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून प्रत्येक विभागांना वर्षभरात राबविलेल्या विशेष उपक्रमांवर सादरीकरण करावे अशा सूचना संबंधित विभागांना दिल्या.

या बैठकीस जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी तसेच इतर शासकीय विभागांचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

# 'उमरठला शिवसृष्टी साकारण्याचा प्रयत्न'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना १० कोटी रूपये देण्याचा शब्द दिल्यानुसार नरवीर तानाजी मालुसरे यांचा भव्य वाडा, भव्य पुतळा समाधीस्थळ आणि स्मारकस्थळ सुशोभिकरण कामासाठी १० कोटींचा निधी उपलब्ध केल्याने शिवप्रेमींनी प्रतापगडानंतर उमरठकडे येऊन शिवराजधानी दूर्गराज रायगडकडे जावे, अशी शिवसृष्टी साकारण्याचा प्रयत्न नजिकच्या काळात करणार असल्याची ग्वाही मंत्री भरत गोगावले यांनी रामाचे उमरठ येथील नरवीरांच्या ऐतिहासिक वाडयाच्या भूमिपूजन सोहळयाप्रसंगी दिली.

या वेळी व्यासपिठावर गटविकास अधिकारी दिप्ती गाट, विस्तारअधिकारी हंबीर, माजी राजिप उपाध्यक्ष तथा जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, माजी उपसभापती शैलेश सल्लागरे, संपर्कप्रमुख किशोर जाधव, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, महिला तालुका प्रमुख सुवर्णा संदेश कदम, सतीश शिंदे, अनिल पवार, संजय मोदी, लक्ष्मण मोरे, काशिनाथ कुंभार, उद्योजक रामदास कळंबे, उमरठचे सरपंच जयराम मोरे, माजी सरपंच इंद्रजित कळंबे, बोरजचे माजी सरपंच भरत चोरगे, नाना कळंबे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.





मंत्री गोगावले यांनी, रायगडच्या पायथ्याशी शासनामार्फत शिवसृष्टीसाठी घेतलेल्या जमिनीवर शिवसृष्टी साकारण्यासाठी निर्धारित केलेला निधी आता शंभर कोटींपेक्षा अधिक लागणार आहे. उमरठच्या सौंदर्यीकरणासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. मात्र, काम दर्जेदार होण्यासाठी ग्रामस्थ आणि शिवप्रेमींनीदेखील लक्ष दिले पाहिजे. काम पुर्ण होईल तेव्हा त्यावेळी जे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री असतील त्यांना याठिकाणी उदघाटनासाठी निमंत्रित करू, असेही आश्वासन यावेळी दिले.

मंगळवारी दिवसभरात सर्वप्रथम साखर पेढेवाडी पुनर्वसन शेड भूमिपूजन, कापडे खुर्द चोरगेवाडी साकवचे भूमिपूजन, आठगाव भैरवनाथ मंदिर रस्ता भूमिपूजन, महालगूर ग्रामपंचायत कार्यालय भूमिपूजन, ओंबळी येथे पुर्नवसन निवारा शेड भूमिपूजन, क्षेत्रपाल विठ्ठलवाडी येथील सभागृहाचे भूमिपूजन, तुटवली येथे भैरी कुंभळजाई मंदिर सभामंडप भूमिपूजन, गोळेगणी येथील पिंपळवाडी येथे अंतर्गत रस्ता भूमिपूजन तसेच मोरगिरी येथे रस्त्याचे भूमिपूजन आणि महादेव मंदिर जीर्णोध्दार भूमिपूजन व भव्य पक्ष प्रवेश झाले.

या भरगच्च कार्यक्रमावेळी शिवसेनेचे चंद्रकांत मोरे, विजय शेलार, कृष्णा कदम, रघुनाथ जाधव, राजु महाडिक, अमित घाडगे, प्रसाद साने, विक्रम भिल्लारे, विकास नलावडे, श्रीराम गायकवाड, किशोर उतेकर, राजाराम केसरकर, अल्ताफ नाडकर, दिपक द.उतेकर, वाय.सी.जाधव, मारुती गोगावले, सचिन कदम, निवृत्ती रिंगे, राकेश उतेकर, अमोल शिंदे, सोपान शिंदे, मंगेश मोरे, कृष्णा नरे, तानाजी निकम, पांडुरंग वरे, विलास उत्तेकर, बाळाराम चाचले, विजय मोरे, चंद्रकांत सणस, प्रकाश कदम, शांताराम गोळे, अनिल दळवी, अविनाश शिंदे, हर्षल सातपूते, तुकाराम पवार,रमेश मोरे, नामदेव उतेकर, अनंत कुंभार, रघुनाथ वाडकर, राजु रिंगे, उमेश कालेकर आदी उपस्थित होते.

# गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील गुंडगे येथील गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूलच्या वतीने यंदा दहाव्या क्रीडा महोत्सवाचे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडाभावना, संघभावना तसेच पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे हा या क्रीडा महोत्सवाचा प्रमुख उद्देश होता.

या क्रीडा महोत्सवासाठी मुख्य पाहुणे म्हणून ए एस ए टेनिस अकॅडमीचे हेड कोच शेखर टोंपे, मिडलाईन अकॅडमीचे संस्थापक व वरिष्ठ प्रशिक्षक तसेच भारतीय पुरुष कबड्डी संघाचे स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच अनिकेत म्हात्रे, मुख्याध्यापिका अजिता नायर, रिट्रीट प्रीचर व ॲनिमेटर, डॉन



बॉस्को युवा संस्था एस डी बी फादर इव्हॅन्जेलो डी'सूझा, पंचायत समिती शिक्षण विभागाचे प्रदीप सुर्वे, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, वैशाली मोरे, विद्यानंद ओव्हाळ, सल्लागार समितीचे सदस्य श्याम पवार, प्रसाद धनगर आदी उपस्थित होते.

या क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी दोन सत्रांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रामध्ये प्री-प्रायमरी ते इयत्ता तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर दुसऱ्या सत्रामध्ये इयत्ता चौथी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांसाठी धावण्याची शर्यत, झिक - झॅग रेस, रस्सी खेच, 'ईटिंग द कोन' यांसारख्या विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलाप्रकारांनी उपस्थितांची मने जिंकली.

स्पर्धांच्या दरम्यान विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त आणि संघभावनेचे उत्कृष्ट दर्शन घडविले. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. या वेळी क्रीडा स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर गतवर्षाच्या दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष गुणगौरव करण्यात आला.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक करत खेळामुळे शारीरिक व मानसिक विकास घडतो, तसेच जीवनात शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण निर्माण होतात, असे मत व्यक्त केले. क्रीडा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या वेळी शाळेच्या व्यवस्थापिका सिस्टर रेसी, मुख्याध्यापिका सिस्टर अमला आदी उपस्थित होते.

## पाली फाटा येथे टँकरची स्कूटीला धडक; एकाचा मृत्यू, दुसरा जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली-पाली मार्गावर पाली फाटा येथील पुलावर बाईक स्वार पालीकडून ब्रिज उतरत होता. त्याच वेळी टँकर ब्रिज वर चढण्यासाठी यू टर्न मारत असताना स्कूटी मागच्या टायर खाली आली. त्यात बाईकस्वार जागीच ठार झाला.

मयत व्यक्तीचे नाव संचित बोरकर (वय ३०) असे आहे. दुसऱ्या घटनेत स्कुटी चालक गंभीर जखमीं झाला. मुंबई-पुणे जुन्या महामार्गा (खोपोली-पनवेल



रस्त्यावर), खालापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत, घोडवली गावाजवळ, माऊली धाब्यासमोर मोटरसायकल अपघातात तरुण गंभीर जखमीं झाला जखमीला एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. संतोष सर्जे राव रांजणे (वय २८, रा पाचगणी सातारा) असे जखमीचे नाव आहे.

# रायगडात स्क्रब टायफसचा रुग्ण

## चीगर किड्याच्या चाव्यामुळे होतो आजार

**महाड, अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यामध्ये स्क्रब टायफस नावाच्या आजाराचा पहिलाच रुग्ण रायगड जिल्ह्यातील दासगावमध्ये आढळून आला आहे. चिगर जातीचा किडा चावल्यामुळे हा आजार होतो मात्र हा आजार संसर्गजन्य किंवा जीवघेणा नसला तरी या आजाराचा पहिलाच रुग्ण सापडल्यामुळे जिल्हा आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले आहे.

महाड तालुक्यातील दासगाव मधील ७२ वर्षीय महिला गेले काही दिवसांपासून ताप खोकला आणि अंगदुखीने त्रस्त होती. मात्र सदर महिला उरण मध्ये मुलाकडे राहत असून त्या ठिकाणी तपासणी केली असता या आजाराचे निदान पुढे आले आहे. त्यानंतर ही माहिती दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला देण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये माहिती मिळताच येथील पथकाने तत्काळ या महिलेचे जिथे घर आहे त्या ठिकाणी धाव घेऊन पाहणी केली. आरोग्य पथकाने या घराची साफसफाई करून आजूबाजूला वाढलेल्या वनस्पती, रोपटी आणि गवत काढून टाकले आणि पावडर फवारणी करण्यात आली अशी माहिती आरोग्य सहाय्यक तुकाराम कापडे यांनी दिली. घराशेजारील आणि गावामध्ये अशा लक्षणांचे रुग्ण आहेत का याची तपासणी देखील करण्यात आली मात्र या ठिकाणी अशा प्रकारचे रुग्ण आढळून आलेले नाही अशी माहिती देखील प्राथमिक आरोग्य केंद्राकडून देण्यात आली आहे. सद्य स्थितीत या महिलेवर पनवेल येथे उपचार सुरू आहेत.

स्क्रब टायफस हा ओरिएंशिया त्सुसुगामुशी या जीवाणूजन्य संसर्गामुळे होतो जो चिगर्समुळे पसरतो आणि ताप, डोकेदुखी, थंडी वाजून येणे आणि पुरळ यांसारखी लक्षणे दिसून येतात. निदानामध्ये क्लिनिकल चिन्हे आणि रक्त चाचण्या किंवा पीसीआर सारख्या प्रयोगशाळेच्या चाचण्यांचा समावेश असतो. उपचार अँटीबायोटिक्सने केले जातात, सामान्यत: डॉक्सीसाइक्लिन, आणि लवकर सुरू केल्यास ते सर्वात प्रभावी उपाय ठरू शकतो अशी माहिती देखील देण्यात आली.

**हा आजार जीवघेणा नसला तरी जिल्ह्यात अशा प्रकारचा पहिलाच रुग्ण आढळल्याने जबाबदारी वाढली आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे. घाबरून जाण्याची आवश्यकता नाही.**

**-डॉ. श्रीकांत बिरादार, तालुका आरोग्य अधिकारी**

# पाच्छापूर, सागवाडी, तिवरे जि.प. शाळांचे परसबाग स्पर्धेत सुयश

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतील परसबाग बहरल्या आहेत. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६मध्ये तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुधागड तालुक्यातील सर्वच शाळांनी आपला सहभाग नोंदवला. पाच्छापूर, सागवाडी व तिवरे जिल्हा परिषद शाळांनी सुयश मिळवले असून या शाळांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेचे परीक्षण तालुकास्तरावरून करण्यात आले. यामध्ये राजिप पाच्छापूर शाळेचा प्रथम क्रमांक, राजिप सागवाडी शाळेचा द्वितीय क्रमांक





व राजिप तिवरे शाळेचा तृतीय क्रमांक पटकवला. तसेच सिद्धेश्वर, रासळ आदीवासीवाडी व भेलीवसावे या जिल्हा परिषद शाळांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे.

तालुक्याच्या गट विकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, विस्तार अधिकारी व पोषण अधीक्षक नवनाथ साबळे यांनी सर्व विजेत्या शाळांना शुभेच्छा दिल्या. तसेच पेडली व नाडसूर केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीबद्दल कौतुक केले आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा परिषद शाळांच्या परिसरात असलेल्या या परसबागांमध्ये विविध प्रकारच्या फळभाज्या व पालेभाज्या यांची लागवड केलेली आहे. ज्यामध्ये भेंडी गवार, वांगी, पालक, दुधी, शिराळे व कारले यासह टोमॅटो आणि इतर भाज्या व फळ व फुलझाडांचा समावेश आहे. या सर्व परसबागांची येथील शिक्षक व विद्यार्थी अतिशय उत्तम प्रकारे निगा राखतात. शिवाय मध्यान भोजनात या भाज्यांचा वापर केला जातो विद्यार्थी या भाज्या ताव मारून खातात.

या परसबागा शाळेजवळ आहेत. त्यामुळे भाजीपाला व झाडांना पाणी देणे, निगा राखणे, तण काढणे सहज सोपे होते. या परसबागांची रचना अशी आहे की कमी जागेत जास्तीत जास्त भाज्या, फुले किंवा औषधी वनस्पती लावता येतात.

**शाळेतील शिक्षकांसह विद्यार्थी परसबाग फुलवण्यासाठी मेहनत घेतात. याद्वारे स्वच्छ व ताजा भाजीपाला मिळतो. या भाज्यांचा मुलांच्या दैनंदिन पोषण आहारात वापर केला जातो. परसबाग फुलवण्यासाठी वापरलेल्या सेंद्रिय खतामुळे या भाज्या आरोग्यासाठी चांगल्या असतात. कमीत कमी खर्चात जास्त उत्पादन मिळते. शिवाय मुलांमध्ये शेतीविषयक आवड निर्माण होते. स्व कष्टातून उभारणी केल्यामुळे अन्नाची किंमत कळते.**

**-अनिल राणे, केंद्रप्रमुख, पेडली व नाडसूर केंद्र**

# थंडीमुळे उबदार कपड्यांना मागणी वाढली

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील सकाळ-सायंकाळचे तापमान लक्षणीयरीत्या घटले असून, पहाटेच्या वेळेस दाट धुक्यासह कडाक्याच्या थंडीची चाहूल लागायला सुरुवात झाली आहे. वातावरणातील या बदलाचा थेट परिणाम शहरातील कपड्यांच्या बाजारपेठेवर दिसून येत असून, उबदार कपड्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. स्वेटर, मफलर, कानटोपी, शॉल, जॅकेट्स आणि लोकरी ॲक्सेसरीज यांची दुकाने ग्राहकांनी भरून जात आहेत.



स्थानिक दुकानांमध्ये या मोसमात विविध रंगसंगतीतील, नव्या डिझाइनमधील आणि हलक्या वजनातील उबदार कपड्यांचे भरपूर पर्याय उपलब्ध झाले आहेत. थंडीरोधक जॅकेट्स ५०० ते तीन हजार रुपयांपर्यंत विविध बजेटमध्ये मिळत आहेत. महिला व पुरुषांसाठी उपलब्ध असलेली 'टू इन वन' जॅकेट्सची श्रेणी तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय ठरत आहे. हलकी, आकर्षक आणि दोन वेगवेगळ्या पद्धतीने वापरता येणारी ही जॅकेट्स खवय्यांच्या पसंतीस उतरलेली आहेत. लहान मुलांसाठी मंकी कॅप, गोली कॅप, जाड स्वेटर आणि फ्लीसची जॅकेट्स ७० रुपयांपासून उपलब्ध आहेत. या वयोगटातील मुलांना थंडीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पालक मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ब्रँडेड व लोकरीचे स्टायलिश कपडेही मोठ्या प्रमाणात विकले जात आहेत.

### ज्येष्ठांसह बालकांसाठी खरेदी

*हिवाळ्यात सर्वाधिक काळजी ज्येष्ठ नागरिक आणि बालकांची घेतली जात असल्याने त्यांच्यासाठी लोकरीचे मोजे, हातमोजे, गरम शॉक्स, कानटोपी आणि मऊ कापसाचे स्वेटर यांची मागणी जोरात आहे. शहरातील दुकानदारांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षीप्रमाणे यंदाही उबदार कपड्यांची विक्री वाढत असून, यापुढील काही आठवडा बाजारपेठ अधिक गजबजलेली राहणार आहे.*

# प्रसिद्ध रांगोळीकार अनिरुद्ध खेडेकर यांना पदवी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील नांदगाव गावात राहणारे प्रसिद्ध रांगोळीकार यांना रांगोळी कार्यात यशस्वी व अवघड अशा रांगोळी प्रत्यक्ष साकार करून सर्वांची मने जिंकणारा अनिरुद्ध खेडेकर यास नुकतीच आयबीआर अचिव्हर ऑफ इंडिया ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली आहे.




रांगोळी विश्वात दोन जागतिक विक्रम तयार केल्यानंतर आता नांदगावचे सुपुत्र, रायगड भूषण पुरस्कार विजेते अनिरुद्ध संदीप खेडेकर यांनी पुन्हा एकदा त्याच रांगोळीच्या रंगांचा वापर करून, डोक्यावर चाळणी घेतलेल्या बालकाची (४ फूट ÷ ३ फूट) आकाराची 'कवडसा' ही हायपर-रिअलिस्टिक पोर्ट्रेट रांगोळी साकारल्याबद्दल या कार्याची पुन्हा एकदा इंडिया बूक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झालेली आहे. आणि त्यांच्याद्वारे या कार्यासाठी इंडिया बुक रेकॉर्ड तर्फे अनिरुद्ध यांना आयबीआर अचिव्हर' ही मानाची पदवी प्रदान करण्यात आलेली असून असून त्यांची तिसर्या जागतिक विक्रमासाठी नोंद झालेली आहे.

'कवडसा', या रांगोळीत बालकाच्या शरीरावर प्रकाश व सावलींच्या सूक्ष्म आणि गुंतागुंतीच्या छटा अत्यंत प्रभावीपणे चित्रित करण्यात आल्या होत्या. सूर्यकिरणाद्वारे पडणारी सावली व प्रकाशाचे जिवंत वर्णन करणारी ही रांगोळी कलाकृती, रेवदंडा येथील श्री कालभैरव जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'वार्षिक रांगोळी कला प्रदर्शनामध्ये' भरवण्यात आली होती. या साकारण्यात आलेल्या उत्कृष्ट रांगोळीची अधिकृत नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे करण्यात आली होती. रांगोळी पाहूनच खेडेकर यांची आयबीआर अचिव्हर ऑफ इंडिया ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली आहे.

सन २०२१ मध्ये अनिरुद्ध खेडेकर यांना आशिया बुक ऑफ रेकॉर्ड , सन २०२३ साली हार्वर्ड बुक ऑफ रेकॉर्ड , लंडन व आता २०२६ मध्ये आयबीआर अचिव्हर ऑफ इंडिया हा मानाची पदवी प्रदान करण्यात येऊन त्यांनी जागतिक क्रमवारीचे ही तीन उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त केले आहेत.

आंतरमहाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी क्रिकेट स्पर्धा

# सीकेटी कॉलेजला विजेतेपद



*शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेले स्वायत्त दर्जाप्राप्त सीकेटी महाविद्यालय शिक्षणाबरोबरच इतरही क्षेत्रात आपला झेंडा नेहमीच फडकवत असते. क्रीडा क्षेत्रातही या कॉलेजचा दबदबा आहे. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थी चमकत असतात. या वेळी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही क्रिकेट स्पर्धेचे विजेतपद पटकाविले.*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रूपारेल महाविद्यालय, माटुंगा, मुंबईद्वारे आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे (रूपारेल क्रीडा उत्सव २०२५-२६) आयोजन करण्यात आले होते. यापैकी शिक्षकेतर क्रिकेट स्पर्धेत मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये पनवेलच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या क्रिकेट संघाने विजेतेपद प्राप्त केले.

या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी अभिजित ठाकूर (कर्णधार), सुमित नारंगीकर (उपकर्णधार), राजा सांवरी, लक्ष्मण वाघमारे, अजय ताठरे, सुमित माळी, रतन दुमणे, जनार्दन गवंडी, दिनेश शीद, रोशन रोडपालकर, रोशन फडके, अस्मितक भगत, अतिश भगत, संजय पाटील, अनिकेत म्हात्रे आणि गुरूनाथ गवंडी यांनी सहभाग घेतला तसेच प्रभाकर गोंधळी, मिलिंद साळवी व साईप्रसाद पाटील यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी. डी. अघाव, महाविद्यालयाच्या कार्यालयीन अधीक्षक प्रतिभा म्हात्रे, महाविद्यालयाचे मुख्य लिपीक, जी.के. सुर्वे यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक केले.

# कर्जतमधील आदिवासी खेळाडूंना मिळणार सिझन बॉल क्रिकेट प्रशिक्षण




**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील आदिवासी खेळाडूंना सिझन बॉल क्रिकेटमध्ये संधी मिळावी यासाठी केपीएच क्रिकेट अकॅडमीचा शुभारंभ करण्यात आला आहे. या अकॅडमीमध्ये निवासी प्रशिक्षणदेखील दिले जाणार असून मुंबई क्रिकेट असोसिएशनचे कोचचे तरुण खेळाडूंना मार्गदर्शन लाभणार आहे.

## अकॅडमीचा शुभारंभ

कशेळे-खांडस रस्त्यावर असलेल्या जांभूळवाडी येथे केपीएच क्रिकेट अकॅडमीचे उद्‌घाटन करण्यात आले. येथे कांता पादीर आणि सचिन लांघी यांच्या माध्यमातून येथे ३६० डिग्रीमध्ये मैदान बनवण्यात आले आहे. या अकॅडमीमध्ये ग्रामीण आणि आदिवासी मुले व मुली प्रशिक्षण घेऊ शकतात.

अकॅडमीच्या शुभारंभानिमित्त येथील मैदानावर १४ वर्षीय मुलांचा ४५-४५ षटकांचा सामना पनवेलमधील प्रतीक स्पोर्ट्स अकॅडमी आणि साईनाथ स्पोर्ट्स अकॅडमी ऐरोली या दोन संघांमध्ये आयोजित करण्यात आला होता. सामने दोन दिवसीय खेळवण्यात आले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त लांब उडी स्पर्धा

## मान्यवरांची उपस्थिती; विजेत्यांना पारितोषिक




**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालय मराठी माध्यमाच्या वतीने संस्था स्तरावर लांब उडी स्पर्धेचे आयोजन सोमवारी (दि.१५) करण्यात आले. स्पर्धेत पाच शाळांमधून ३६ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला

स्पर्धेचे उद्‌घाटन प्रमुख अतिथी संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्य वर्षा प्रशांत ठाकूर, ॲड. राहुल घरत तसेच इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, ज्युनियर कॉलेजचे पर्यवेक्षक अजित सोनवणे यांच्या



हस्ते झाला. स्पर्धा विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांच्या अध्यक्षतेखाली व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

या वेळी प्रमुख अतिथी वर्षा ठाकूर यांनी मनोगतात , खेळामुळे शारीरिक सदृढता वाढण्यास मदत होते. शालेय जीवनात मी धावण्याच्या स्पर्धेत नेहमी प्रथम क्रमांक प्राप्त करत होते तसेच खो-खो खेळाची आवड असल्यामुळे संघाचे नेतृत्व करत होती, असे सांगून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

ॲड. राहुल घरत यांनी, लांब उडी मारण्यासाठी आपण जशी लांब झेप घेतो तसेच आपल्या जीवनात ध्येय गाठण्यासाठीसुद्धा लांब झेप घेऊन यशस्वी व्हावे, असे आवाहन करून शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रमुख पाहुणे संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य स्वप्नील ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या मनोगतात शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला तसेच खेळात जसे यश प्राप्त करतात त्याचप्रमाणे अभ्यासातदेखील यश प्राप्त करा, असे सांगितले. या वेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर हेही उपस्थित होते.

स्पर्धेचे संयोजक म्हणून विलास यशवंतराव व ज्योती बडवी यांनी काम पाहिले, तर यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार सारिका दिवेकर यांनी व्यक्त केले.

# आर्यन नाईकची आयएसपीएलमध्ये निवड

## क्रीडा महोत्सवात केला सत्कार

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

टेनिस क्रिकेटमध्ये प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजमध्ये शिकत असलेल्या आर्यन रामदास नाईक यांची श्रीनगर के वीर संघाकरिता निवड झाली आहे.

आयएसपीएल स्पर्धा देशभरातील आठ संघांमध्ये गुजरात राज्यात खेळली जाणार आहे. स्पर्धेच्या लिलावादरम्यान



आर्यन नाईकला तीन लाख रुपये बोली लावत श्रीनगर के वीर या संघाने आपल्या ताफ्यात घेतले.

या निवडीबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षक प्रणिता गोळे, अरुण जोशी, क्रीडा शिक्षक वामन कुराडे, वर्षा नलावडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी आर्यनचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, विद्यालयाच्या क्रीडा महोत्सवात संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आर्यनचा सत्कार करण्यात आला. या वेळी शाळेचे स्थानिक चेअरमन भार्गव ठाकूर, संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत आदी उपस्थित होते.

# सागरी जलतरण स्पर्धेत शिहू बेणसे विभागातील खेळाडूंची चमकदार कामगिरी



**पाली : प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटना आणि महाराष्ट्र राज्य जलतरण संघटना यांच्या मान्यतेने १५वी राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा मालवणजवळील चिवला बीच येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत सहभाग घेऊन रायगडच्या शिहू बेणसे विभागातील खेळाडूंनी पदके मिळवून शान वाढवली.

स्पर्धा ६ ते ५६ अशा वयोगटात होती. स्पर्धेत भारताच्या अनेक राज्यातील १५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. जलद गतीने अंतर पार करणाऱ्या खेळाडूंना विशेष गौरवण्यात आले. यामध्ये शिहू बेणसे विभागातील मनन जीवन घासे, त्रिशूल हितेश कुथे, क्रिश विजय कुथे, मयुष मनोज ठाकूर, रियांश मनोज ठाकूर, पलक महेश पाटील, जान्हवी रूपेश पाटील यांनी पदके पटकाविली. त्यांना प्रशिक्षक सुनील पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# आयसीसीच्या नियमामुळे वैभव सुर्यवंशीला टीम इंडियात पदार्पणाची प्रतीक्षा

**मुंबई : प्रतिनिधी**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये अलीकडेच एका १४ वर्षीय खेळाडूने आपल्या चमकदार कामगिरीने क्रिकेट जगताचे लक्ष वेधून घेतले. बिहारचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने रणजी ट्रॉफीसारख्या प्रतिष्ठित स्पर्धेत पदार्पण करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले, मात्र या प्रचंड प्रतिभावान खेळाडूला लवकरच भारतीय सिनियर संघात संधी मिळणे अशक्य झाले आहे, कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या नियमांमुळे त्याच्यावर ब्रेक लागला आहे.




वैभव सूर्यवंशी सध्या केवळ १४ वर्षांचा आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये (टेस्ट, वनडे आणि टी-२०) खेळण्यासाठी आयसीसीने नोव्हेंबर २०२०मध्ये एक कठोर नियम लागू केला आहे, ज्याला 'मिनिमम एज लिमिट' नियम म्हणतात. या नियमानुसार कोणत्याही खेळाडूला आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी त्याचे वय किमान १५ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. पुढील वर्षी २७ मार्चला वैभव १५ वर्षांचा होणार आहे. यानंतर तो भारताच्या वरिष्ठ संघात खेळण्यास पात्र होणार आहे.

आयसीसीने खेळाडूंचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य आणि सुरक्षितता लक्षात घेऊन हा नियम बनवला आहे. म्हणजेच वैभव सूर्यवंशी याला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्याला किमान पुढील चार महिने वाट पाहावी लागणार आहे, जोपर्यंत तो १५ वर्षांचा होत नाही.

## रायगड जिल्हा अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धा उरणला

**अलिबाग** : रायगड जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटनेच्या मान्यतने द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे रायगड द्रोणागिरी श्री २०२५, रायगड द्रोणागिरी फिजिक २०२५ व रायगड द्रोणागिरी उदय २०२५ शरीरसौष्ठव स्पर्धा २५ डिसेंबर रोजी बोकडवीरा येथील पटांगणावर होईल. अधिक माहितीसाठी जितेंद्र गुरव (९९२०४ ४४३५१), संतोष साखरे (९४२११६४०८४) यांच्याशी संपर्क साधावा.

# क्रिकेट स्पर्धेत अलिबागमधील वायशेत संघाचे दुहेरी यश



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील गावदेवी वायशेत क्रिकेट संघाने एकाच दिवसात दोन ठिकाणच्या स्पर्धांमध्ये यश मिळविले आहे.

वायशेत संघाने चाळमळा येथे आयोजित दमदार आमदार चषक स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला, तर तीनविरा येथे झालेल्या स्पर्धेत तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

यशस्वी संघात धीरज शिळीमकर, पंकज शिळीमकर, ओंकार म्हात्रे, अभिराज पाटील, अभिलाष पाटील, नीरज पाटील, ओंकार पाटील, निकेश म्हात्रे, मिलिंद पाटील, किशोर भगत, प्रथम पाटील, निमेश पाटील, कपिल पाटील यांचा समावेश होता. या संघाचे अभिनंदन होत आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com